विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३५**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक ९ / मार्च २०००



## संपादकीय

### *इयत्ता १ली पासून इंग्रजी*

२९ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी इ.स.२००० ते २००१ या शालेय वर्षात प्राथमिक शाळेत इयत्ता १ली पासून इंग्रजी शिकविण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे तसा आदेशही काढण्यात आला आहे. या प्राथमिक शाळेत इंग्रजी विषय शिकविताना माध्यम मराठीच राहील व वेगळे शिक्षक न नेमता असलेल्या शिक्षकांपैकीच काही शिक्षक ती शिकवीतील. यासाठी आवश्यक तो अभ्यासक्रम आणि पाठ्य सामुग्री यांची निर्मिती संबंधित मंडळ सहा महिन्यात करेल.

इंग्रजी भाषेच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारने आत्तापर्यंत वादग्रस्त निर्णय घेतले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इंग्रजी विषयीचा द्वेष दाखविण्यासाठी म्हणा किंवा इंग्रजीचे सरकारी कामकाजातील महत्त्व कमी करण्यासाठी म्हणा १९४८ मध्ये बाळासाहेब खेर.... मोरारजी देसाई मंत्रिमंडळाने इंग्रजीचे अध्यापन ८वी पासून करण्याचा निर्णय घेतला. चूक समजल्यावर पुन्हा ते ५वी पासून करण्यात आले.

काहींच्या मते ८ वी पासून इंग्रजीचे अध्यापन करण्याचा निर्णय राज्यकर्त्यांनी राजकीय दृष्टिकोनातून घेतला होता.

प्राथमिक शिक्षणाला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा त्यामध्ये आमूलाग्र सुधारणा होतील. त्यामुळे घिसाड घाईने इंग्रजी शिकविण्याचा मार्ग अवलंबिला तर मुलांचे हित होण्याऐवजी अहितच होईल.

काही काळ गेल्यावर जनतेने इंग्रजी माध्यम शाळेत मुलांना घालणे सुरु केले. इंग्रजी माध्यम शाळा वाढू लागल्या. असे झाल्यावर मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांतील हुशार विद्यार्थ्यांना ८वी पासून विज्ञान व गणित हे दोनच विषय इंग्रजीतून शिकविण्याची परवानगी देण्यात आली.

गेल्या वर्षापर्यंत इयत्ता ५वी त इंग्रजीचे अध्ययन कठीण जाते यासाठी अनेक शाळांनी आपल्या प्राथमिक विभांगात ३री पासून इंग्रजी शिकवणे सुरु केले होते. मग असे असताना ही गंगा १ली पर्यंत उलटी नेण्यास अनेकांनी आरडाओरड का करावी ? ४थी पर्यंत मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे असे शैक्षणिक धोरण आहे व त्याप्रमाणे आता जरी १ली पासून इंग्रजी शिकविले जाणार असले तरी ते मातृभाषेतून दिले जाणार आहे.

२१व्या शतकात नवे प्रश्न निर्माण होणार आहेत. शिक्षण क्षेत्र हे शाळा महाविद्यालयांपुरतेच मर्यादित रहाणार नाही. नवीन अभ्यासक्रमाला तोंड देऊ शकेल असा शिकणारा समाज निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम शिक्षणाचेच आहे आणि कोणी काही म्हणोत ही आव्हाने स्विकारावी लागणार आहेत.

आता त्या दृष्टीने इंग्रजी भाषा शिकविताना ती प्रथम संभाषणापुरतीच मर्यादित ठेवा व लेखन, वाचन नंतरच्या वर्गात हळू हळू वाढवावे. मराठी सुधारण्याचेही वर्ग असावे.

जागतिकीकरण करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकावयाचे म्हणजे इंग्रजी यायलाच हवे. इंग्रजी ऐकण्या बोलण्यापेक्षा भाषा व्यक्त करणे महत्त्वाचे आहे. आपल्या मातृभाषे प्रमाणेच नवीन भाषेतून विद्यार्थ्याला आपल्या भावना, सुखदुःख, विचार, संभाषण इत्यादी व्यक्त क रणे महत्त्वाचे आहे व त्या दृष्टीने शिक्षकास प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे. परंतु या संदर्भात सरकारची कृती थोडीशी घाई गर्दीचीच वाटते. कारण तज्ञ, विचारवंत, प्रशासक आणि लोकप्रतिनीधी यांच्याशी चर्चा न करता एकतर्फी सरकारने निर्णय घेतला आहे. तसेच, इतर दूरगामी निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुरेशी तयारीही केलेली नाही. सहा महिन्यात अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणे खरोखरीच कठीण आहे. मग शिक्षकांचे प्रशिक्षण तर दूरच राहो. इंग्रजीचा कस वाढविण्याकडे शिक्षकाला जास्त लक्ष द्यावे लागेल.

१ली, २री मध्ये लिपीची ओळख, लहान, लहान शब्द, छोटी छोटी वाक्ये इतकेच मर्यादित शिक्षण असावे. पाठांतरावर जास्त जोर असावा. त्यानंतर हळू हळू ते वाढवत न्यावे. लहान वयात मुले लवकर भाषा आत्मसात करतात. त्यामुळे इंग्रजीला विशेष महत्त्व द्यावे की नाही ह्याची चर्चा सोडून हा विषय परिणामकारक पद्धतीने कसा शिकवता येईल यावर सकारात्मक विचार व्हावा. भाषा हे संपर्काचे साधन आहे. त्याच दृष्टिकोनातून विचार व्हावा.

मराठी भाषा वाचवावयाची असेल तर इंग्रजी माध्यम शाळेत सुद्धा मराठीचे शिक्षण सक्तीचे करावे. भाषा आणि संस्कृती यांचे नाते माय लेकी सारखे आहे. भाषेची नाळ तुटली की संस्कृतीचा विनाश होण्यास फारसा वेळ लागत नाही. त्यामुळे मराठी मुलाने अवश्य इंग्रजीवर प्रभुत्व मिळवावे आणि पार इंग्लंड अमेरिकेपार झेंडे लावावे परंतु आपली मराठी भाषा विसरु नये.

राज्याच्या भविष्याच्या दृष्टिने हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे त्यावर वास्तुनिष्ठ आणि व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे व त्याचबरोबर हे ही लक्षात ठेवावे की इंग्रजीमुळे आपण जगाशी संपर्क करु शकतो.

अचलकुमार टिल्लू
संपादक

• • •

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष चौथे / अंक ९ / मार्च २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी टांडेकर
**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
सौ. भारती जोशी
सौ. मंगला घाटणेकर
सौ. मनाली देवध
सौ. विशाखा देशपांडे
श्री. संजय बोरकर
सौ. विनोदिनी राणे
सौ. सुलक्षणा पाध्ये
कु. दीपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | |
| २) | परीक्षापद्धतीला अवास्तव महत्त्व दिले जात असल्याने शिक्षणाची मूळ उद्दीष्टे साध्य होत नाहीत. | श्री. प्र.ग. वैद्य | ३ |
| ३) | २०व्या शतकातील शैक्षणिक वाटचाल (लेखांक २) | श्री. अ.धों. टिल्लू | ६ |
| ४) | एक आगळं-वेगळं विश्लेषणतंत्र | प्रा.सौ. सुषमा पौडवाल | ११ |
| ५) | ''माणसातला 'कवी' बेपत्ता... | कु. शिल्पा ल. पाटील | १४ |
| ६) | 'रिंकु पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे आपण कोठे चुकतो ? | पद्मा सुर्वे-भाटकर | १६ |
| ७) | 'व्हिजन २०००' | कु.दीपाली सुरते | १८ |
| ८) | बातचीतः बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी | कु.दीपाली भाटकर व अरुण ठाकूर | २० |
| ९) | योग्य कामाचा योग्य गौरव | कु.दीपाली भाटकर | २३ |
| १०) | छोट्यांच्या राज्यात | प्रतिनिधी | २५ |
| ११) | आठवणींचे पक्षी- बालपणाच्या दाहक आठवणी | मानसी | २६ |
| १३) | महाराष्ट्राचा इतिहास | | २८ |
| १२) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | २९ |


सुविचार संकलन : श्री. शरद ललित यांनी केले आहे

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

निसर्गात बेडौल व कुरुप असे काहीच नाही.

# परीक्षापद्धतीला अवास्तव महत्त्व दिले जात असल्याने शिक्षणाची मूळ उद्दिष्टे साध्य होत नाहीत.

**श्री. प्र.ग. वैद्य**

*( परीक्षा असावी की नसावी या विवाद्य विषयावर बरेच बोलता येईल. परंतु वैद्य सरांसारखे ज्येष्ठ शिक्षक या विषयावर मूलभूत विचार मांडतात तेव्हा अंतर्मुख होऊनच विचार करावा लागतो. -संपादक)*

आज जर एखाद्या विद्यार्थ्याला प्रश्न विचारला की, 'तू शाळेत का जातोस, का शिकतोस, सर्व विषयांचा अभ्यास मेहनत घेऊन का करतोस ? ' तर तो - पटकन उत्तर देईल, 'परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी ! पुढे तो म्हणेल 'एस्.एस्.सी. झालो की प्रमाणपत्र मिळेल. त्याच्या आधारे नोकरी मिळेल किंवा पुढील शिक्षण घेता येईल. शिक्षक, पालक ही त्याला परीक्षेत उत्तीर्ण झाले पाहिजे असेच सतत बजावीत असतात. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तो विद्यार्थी त्यांना पूरक अशा मार्गांचा अवलंब करतो. तो परीक्षेत अपेक्षित असलेल्या प्रश्नांची उत्तरे तोंडपाठ करतो, त्याची घोकंपट्टी करतो. उत्तरे व्यवस्थित लिहिता यावीत म्हणून तो कोचिंग क्लासेसना जातो. परीक्षेचे वेळी प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर तो कॉपी करतो किंवा अन्य वाममार्गांचा उपयोग करतो.

जर परीक्षा पद्धत बंद केली व प्रत्येक विषय शिकण्याची उद्दिष्टे त्या विद्यार्थ्याला प्रथमच सांगितली तर तो विद्यार्थी तो-तो विषय त्या त्या उद्दिष्टाने शिकेल. त्या त्या विषयांचा चांगला व मनापासून अभ्यास करील. उदाहरणार्थ वर्षभर सातत्याने वर्गात उपस्थित रहाणारा व विषयाकडे नीट लक्ष देणारा विद्यार्थी वर्ष संपताच परीक्षा न घेता पुढच्या वर्गात जाईल. दुसऱ्या वर्षी तो त्या पुढच्या वर्गात जाईल. असा तो १०वी पर्यंत वरच्या वर्गात तो जात राहील. अशी पद्धत सुरू झाल्यानंतर व ती रुळल्यानंतर जर एखाद्या विद्यार्थ्यास वरील प्रमाणेच प्रश्न विचारला की तू शाळेत का जातोस, तर तो उत्तर देईल मला विविध विषयांचे ज्ञान व्हावे, ते विषय मला कळावेत म्हणून मी शाळेत जातो. मी परीक्षेत उत्तीर्ण व्हावे म्हणून शाळेत जातो असे तो म्हणणार नाही. साहजिकच विषय शिकण्याची उद्दिष्टे त्यामुळे साधली जातील. ह्या विषयावर सविस्तरपणे विचार मांडता येतील पण लेखाची मर्यादा लक्षात घेऊन ते विचार येथे मांडत नाही.

शिक्षणाची उद्दिष्टे प्राचीन काळापासून शिक्षणतज्ज्ञ सांगतच आले आहेत. मनुस्मृतीतील चार आश्रमातील 'ब्रह्मचर्याश्रम' हा शैक्षणिक टप्पा, त्यात मनूने म्हटले आहे, 'मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक सामर्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण !' त्यानुसार गुरूंच्या आश्रमात राहून, स्वावलंबनाचे शिक्षण शिष्य घेत असे. पहाटे लवकर उठणे, थंड पाण्याने आंघोळ करणे, सूर्य नमस्कार व अन्य प्रकारचा व्यायाम करणे, शेती करणे, गुरे चारणे, झाडलोट करणे, लोकांची सेवा करणे, इश्वरोपासना करणे, ग्रंथांचे-बौद्धिक विषयांचे अध्ययन करणे इत्यादी कामे तो करीत असे. त्यातून सर्व उद्दिष्टे साध्य होत असत. खऱ्या अर्थी 'फोर एच' (हेड, हार्ट, हॅन्ड, हेल्थ) असा बौद्धिक, भावनिक, औद्योगिक, शारीरिक विकास म्हणजे सर्वांगीणविकास तो गुरुगृही करून घेत असे. बाहेरील जगाचे हुबेहुब चित्र शिक्षणातून प्रतिबिंबित होत असे.

पुढे गुरु राजाश्रय घेऊ लागल्याने हे आश्रम नष्ट

झाले. त्या नंतर अनेक वर्षांनी भारतात इंग्रजांची सत्ता आली. ब्रिटीश राज्ययंत्रातील हजारो लहान मोठी चाके फिरती ठेवणे व त्यासाठी आवश्यक ते कारकून तयार करणे म्हणजे निव्वळ पुस्तकी शिक्षण देणे एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट इंग्रजांचे होते. त्यासाठी बौद्धिक,लेखी परीक्षा घेतल्या जाऊ लागल्या. परीक्षा उत्तीर्ण झाला की नोकरी मिळू लागली. त्यामुळे पुस्तकी शिक्षणाची लोकांची हाव वाढली. शिक्षण घेतलेले लोक कावाड कष्ट करीनासे झाले. लोकांनी पिढीजात धंदेही बंद केले. सर्वत्र कृतिशून्यता निर्माण झाली. पुढे पदवीधरांची संख्या वाढली. पण तेवढ्या प्रमाणात नोकऱ्या नसल्याने बेकारांचे प्रमाण वाढू लागले. बेकारांच्या झुंडीच्या झुंडी निर्माण झाल्या. भारत स्वतंत्र होऊन आज ५३ वर्षे पूर्ण झाली आहेत तरी बेकारांचे प्रमाण कमी होत नाही. उलट वाढतच आहे. 'इंग्रजांनी सुरु केलेली ही परीक्षा पद्धती व निव्वळ पुस्तकी ज्ञान म्हणजे शिक्षण ही कल्पना' अद्याप नाहीशी झाली नाही.

वास्तविक पहाता 'ज्या संस्कारांनी विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित होते त्या संस्कार समुच्चयाला शिक्षण' म्हणतात. अशी व्यापक व्याख्या शिक्षणाबद्दलची आहे. हीच 'फोर एच' ची कल्पना आहे. सॉक्रेटीस, कोमिनियस, रूसो, पेस्टालोत्सी, फ्रॅबेल, हर्बार्ट, मारीया मॉटेसरी, आर्मस्ट्रॉंग, जॉन ड्यूई, महात्मा गांधी इत्यादी सर्व विचारवंतांनी, शिक्षण तज्ज्ञांनी निव्वळ पुस्तकी ज्ञानाचा तिरस्कार केला व गुणवत्ता वाढविणाऱ्या, अपुस्तकी, श्रममूलक विषयांचाही आपल्या शिक्षण पद्धतीत समावेश केला. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे सूत्र होते.

१९५३ मध्ये भारतात मुदलियार आयोग अस्तित्वात आला. त्या अभ्यास क्रमात अपुस्तकी विषय कार्यानुभव यास स्थान देण्यात आले होते. पण त्याचा प्रभाव पडला नाही. १९६४-६८ मध्ये कोठारी आयोग स्थापन झाला. त्यात शिक्षणाचा संबंध राष्ट्रीय विकासाकडे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे जोडण्यात आला. राष्ट्रीय विकासातील अडथळे म्हणजे देशातील बेकारी व नागरिकांची भ्रष्टता, अनैतिकता! सर्वांना व्यवसाय मिळाला पाहिजे, नागरिकांचे वर्तन चांगले पाहिजे म्हणून त्या अभ्यास क्रमात कार्यानुभव व समाजसेवा या विषयांचा समावेश करण्यात आला. कोठारी आयोगाची चतुःसूत्री अशी होती. (१) साक्षरता, भाषा, साहित्य व सामाजिकशास्त्रे यांचा अभ्यास (२) संख्या-विज्ञान यात गणित व भौतिक शास्त्रे यांचा अभ्यास (३) कार्यानुभव यात शेतीविषयक विषय व तांत्रिक व्यवसाय यांचा अभ्यास (४) समाजसेवा यात स्काऊट-गाईड, एन.सी.सी. व स्वतंत्रपणे तयार केलेल्या 'समाज सेवा' या विषयांचा अभ्यास.

भारत शेतकी प्रधान देश असल्याने शेती विषयातील (१) सुलभ शेती कार्य (२) परसातील बागकाम (३) कुंडीतील लागवड या विषयांपैकी एक तरी विषय शाळेने घ्यावा असे सुचविण्यात आले होते. समाज सेवा विषयातील स्काऊट-गाईड, एन.सी.सी., समाजसेवा यातील एकतरी विषय शाळेने घ्यावा असे सुचविण्यात आले होते. या चतुःसूत्रीतील सर्व विषयांना गुण द्यावेत अशी शिफारस करण्यात आली होती. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. पुस्तकी विषयांना गुण व अपुस्तकी विषयांना श्रेणी देण्यात आली. पुस्तकी ज्ञानाचा पगडा अद्याप सैल न झाल्याचे हे लक्षण आहे. कोठारी आयोगाच्या अभ्यास क्रमाची पहाणी करणाऱ्या ईश्वरभाई पटेल समितीने कार्यानुभव व समाजसेवा या विषयांनाही गुण द्यावेत तरच हे विषय शाळेत नीटपणाने शिकविले जातील अशी शिफारस १९८२ साली केली होती. पण त्याचा काहीही परिणाम अभ्यासक्रमाची कार्यवाही करणाऱ्या समितीवर झाला नाही. साहजिकच ज्या विषयांना गुण देण्यात येतात त्या विषयांकडे शाळेने व पालकांनी लक्ष दिले व ज्या विषयांना श्रेणी दिल्या जातात म्हणजेच गुणांच्या टक्केवारीत

ज्या विषयांना स्थान नाही त्याकडे या सर्वांनी दुर्लक्ष केले.

१९८६ पासून नव्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास' प्रारंभ झाला. पण त्यात ही अपुस्तकी विषयांना न्याय मिळाला नाही. शील संवर्धनावर भर देणाऱ्या व उत्तम नागरिक घडविणाऱ्या स्काऊड-गाईड शिक्षणास जर अभ्यासक्रमात गुण देऊन मानाचे स्थान देण्यात आले. तर वेगळ्या नैतिक शिक्षणाची गरज काहीही आवश्यकता भासणार नाही. स्काऊट-गाईड ही स्वतंत्र संस्था आहे. शिक्षकांना प्रशिक्षण देणे. त्या विषयाची पहाणी करणे ही कामे संस्थाच करते. शिक्षण खात्यास त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकताच भासणार नाही. एन.सी.सी. ही सुद्धा स्वतंत्र संस्था आहे. समाजसेवा ह्या विशेष तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या संयोजनासाठी व शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी आंतर भारती संस्थेचे सहकार्य शासनाने घ्यावे. ही संस्था आपल्या प्रेरणा प्रबोधन शिबिरातून समाजसेवेचे प्रशिक्षण शिक्षकांना देऊ शकेल. शासनाने तशी त्या संस्थेस विनंती मात्र करावयास हवी. 'एम.सी.सी.' या शासनाने तयार केलेल्या विषयाची काही आवश्यकताच भासणार नाही.

कार्यानुभव विषयात सध्या ३० विषयांची यादी देण्यात आली आहे. त्याचा अभ्यासक्रम तयार आहे. त्यात संगणक वगैरे सर्व विषय आहेत. कार्यानुभवात चित्रकलेचाही समावेश असल्याने बहुतेक शाळा कार्यानुभव विषयासाठी चित्रकला विषय घेतात. संगणकाचे शिक्षण शाळेतून दिले जावे असे कोणीतरी सुचवितो व अभ्यासक्रमाचा अभ्यास न करता शिक्षणखाते हा विषय शाळेत ठेवण्यात येईल असे आश्वासन देते. प्रत्यक्ष तो विषय कार्यानुभवाच्या अभ्यासक्रमात आहे. चित्रकला विषय घेतला नाही तर त्या जागी तो विषय घेता येईल.

रा.शै. धोरणातील दहा गाभा तत्वात 'पर्यावरणाचे संरक्षण' हे ही एक तत्त्व दिलेलेच आहे. पर्यावरण विषय शाळेत शिकवावा असे आता सुचविले जात आहे. त्याचा आधीच विचार अभ्यास क्रमात आहे.

अपुस्तकी विषयांना गुण नसल्याने त्यांकडे दुर्लक्ष होत आहे. पुस्तकी विषयांना गुण व अपुस्तकी विषयांना श्रेणी हा पंक्तिप्रपंच थांबल्या खेरीज, नैतिक शिक्षण, पर्यावरण इत्यादी विषयांकडे शाळा व पालक लक्ष देणार नाहीत. नाहीतर कोणत्याच विषयांना गुण देऊ नका, परीक्षा घेऊ नका !

निव्वळ परीक्षार्थी बनलेल्या विद्यार्थ्यांना ते विषय शिकण्याचे हेतू कळणार नाहीत. केवळ परीक्षेचा विषय म्हणूनच ते त्या विषयांकडे पहातील. परीक्षा पद्धती बंद झाली तर सर्व विषयांचा त्या विषय शिकवण्याच्या हेतूसह अभ्यास करतील.

**श्री. प्र.ग. वैद्य**
लक्ष्मी निवास, घंटाळी मंदिरासमोर, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४३२०७२

• • •

*With Best Compliments from*

**M/s Ceramic Studio**
**Fixtures & Paintings**
for
complete home

3/4, Shiv Kanchi,
Gen. Arun Vaidya Marg,
Panchpakhadi, Thane (w) 400 602.
Tel. : 5339645 Fax : 5332823

# २०व्या शतकातील शैक्षणिक वाटचाल (लेखांक २)

श्री. अ.थीं. टिळ्ळू

*(आपल्या देशातील शैक्षणिक इतिहासाचा धावता परामर्श घेऊन सदर लेखात शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने काही व्यवहार्य सूचना केलेल्या आहेत. - संपादक)*

## प्राथमिक शिक्षण

आपल्या देशाने घटनेच्या ४५व्या कलमानुसार प्रत्येक मुलाची मुलभूत गरज समजून प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले आहे. " The state will endavour to provide free and compulsary primary education to all the children upto the age of fourteen within 10 years of the adoption of the constitution." २६ जानेवारी १९५० ला वरील ४५वे कलम अस्तित्वात आले पण अजून प्राथमिक शिक्षण सर्व राज्यात सक्तीचे व मोफत झालेली नाही. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी जी भाषणे दिली ती प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहेत. In individual instances primary education may not shown very decided results but taken in the mass it means for the bulk of the community of higher level of intelligences, a greater aptitude for skilled labour and a higher capacity of discriminating between right and wrong. It raises in fact the whole line of the life or the large number.

१८९३ पूर्वी खेड्यापाड्यातूनही शाळा होत्या. साधारणपणे ४०० मुलामागे १ प्राथमिक शाळा होती. सर्वच म्हणजे श्रीमंत, मध्यमवर्ग, शेतकरी, व्यापारी यांच्या मुलांना या शाळातून शिक्षण दिले जाई. वर्गीकृत जाती जमाती व मुली हे त्याचा फायदा घेऊ शकत नव्हते. लेखन, वाचन आणि अंकगणित हे विषय आणि धार्मिक शिक्षण शाळांतून देत.

शिक्षक देणग्यांमधून व मुलांकडून मिळालेल्या फी मधून आपला चरितार्थ चालवीत असत. काही मोठे, छोटे श्रीमंत पालक आपल्या मुलांना घरीच शिक्षण देत व मग आजुबाजूची काही मुले तेथे येऊन त्या श्रीमंताच्या मुलांबरोबर शिकत. शाळांच्या इमारती नव्हत्या. शिक्षकांच्या घरी, पालकांच्या घरी, देवळात किंवा मशिदीत शाळा भरत. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या विशिष्ट अशा सामाजिक रचनेमुळे स्त्रीच्या शिक्षणाची कल्पना नव्हती.

## इ.स. १८१३ ते इ.स. १९०२

१८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने दरवर्षी शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी रु.१ लाख मदत देण्याचे ठरविले. तरी सुद्धा म्हणावा तसा प्रसार झाला नाही. त्यानंतर १८८२ मध्ये श्री. दादाभाई नवरोजी यांनी मोफत व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची मागणी केली पण या मागणीकडेही दुर्लक्षच झाले. त्यावेळी १.६६ दशलक्ष एवढी मुले शाळेत होती, म्हणजे प्रत्येक ११४ व्यक्तींमध्ये १ व्यक्ती प्राथमिक शिक्षण घेत होती. शिक्षणाचा खर्च माणशी ८.७१ होता. काही ब्रिटीश नेते सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची कल्पना मांडीत होते. २०व्या शतकाच्या सुरुवातीला मुलींच्या शिक्षणाची परिस्थिती थोडीफार सुधारली. परंतु आर्थिक अडचणी मुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची कल्पनाच धुडकावून लावण्यात आली. सरकारने प्राथमिक शिक्षणापेक्षा उच्च शिक्षणाकडे लक्ष दिले. इ.स. १८९३

अंधारात बावरणाऱ्याला मित्र नसतो.

मध्ये त्यावेळच्या बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु केल्याचे एकमेव उदाहरण आहे.

### इ.स. १९०२ ते इ.स. १९१८

त्यानंतर भारतीय स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीमुळे जनमत जागृत झाले व त्यामुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी कायदा करावा असे प्रयत्नही झाले. परंतु कायदे मंडळात ठराव आणूनही सरकारने तो अव्यवहार्य असे ठरवून फेटाळला. सयाजीराव महाराजांच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामुळे जनमत तयार होण्यास मदत झाली. त्या काळातील गोखले, रहिमतुल्ला, जस्टीस सेटलवार्ड, इत्यादी नेत्यांमुळे व लॉर्ड कर्झन यांनी इ.स. १८९९ ते १९०५ या काळात प्राथमिक शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान मंजूर केले. या सर्वांचा परिणाम म्हणजे १९०२ ते १९१८ च्या काळात प्राथमिक शिक्षणाचा थोडाफार प्रसार झाला.

### इ.स. १९१८ ते इ.स. १९५०

इ.स. १९१८ मध्ये पटेल कायदा अंमलात आला व त्यानुसार मुंबई प्रांतातील नगरपालिकांचा ६ ते ११ वर्षाच्या मुलाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यास परवानगी देण्यात आली. परंतु यामध्ये एक जाचक अट होती की नगरपालिकेत उपस्थित असणाऱ्या २/३ प्रतिनिधींनी निर्णयास अनुमोदन द्यावयास हवे. त्यामुळे १९२२ पर्यंत केवळ चार नगरपालिकांनी याचा फायदा घेतला. इ.स. १९२१ मध्ये हिंदुस्थान सरकारने शिक्षणखाते लोक प्रतिनिधींकडे सुपूर्द केले.

१९३७ प्रांतांना स्वायत्तता दिल्यावर शिक्षणाच्या नियोजनाची आणि अर्थ व्यवस्थेची सर्व जबाबदारी प्रांतिक सरकारांकडे गेली. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला चालना मिळाली.

याच काळात राष्ट्रीय चळवळ सुरु झाल्यामुळे राजकीय बदलाबरोबर सामाजिक बदलही झाले व शिक्षणामुळे जीवनमान सुधारते हे लोकांना कळू लागले.

इ.स. १९१८ ते इ.स.१९३० या काळात अनेक प्रांतांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. भारत सरकारने शिक्षण विषयक कमिशनर म्हणून सर जॉन सार्जंट हे काम करीत असताना इ.स. १९४४ मध्ये मध्यवर्ती शिक्षण सल्लागार समितीने आणखी एक योजना आखली जिला सार्जंट योजना म्हणतात.

चाळीस वर्षाच्या कालावधीत ६ ते १३ वयोगटातील मुलांना सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाखाली आणणे अशीही योजना पुढे येताना गेलेल्या खेर समितीने ही कालमर्यादा १६ वर्षावर आणली. याचाच अर्थ सार्जंट समितीच्या शिफारशी प्रमाणे प्राथमिक शिक्षणाचे जे काम इ.स. १९४४ पासून १९८४ पर्यंत होईल असे वाटत होते ते ६० सालपर्यंत संपेल असा खेर समितीचा अंदाज होता. या सर्वांची फलश्रुती एकच, म्हणजे १९५० मध्ये प्रत्येक राज्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा संमत झाला.

खेर समितीचा अंदाज ग्राह्य मानून भारतीय घटनेने १९५० पासून १० वर्षाच्या कालावधीत घटक राज्यांनी सर्व मुलांना वयाच्या १४ वर्षापर्यंत मोफत प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा असा आदेश दिला. १९५० साली प्राथमिक शाळांची संख्या २.१० लाख होती. १९६५ - ६६ मध्ये ती ४ लाख झाली. तर विद्यार्थी संख्या १९१ लाखावरून ५११ लाख झाली.

त्या वेळी १९६५-६६ मध्ये विद्यार्थ्यामागे दर डोई खर्च ३०.४ होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप असे होते.

---

इच्छेला विश्रांती अशी माहीतच नाही.

१) प्राथमिक शिक्षणाचा पुष्कळ विकास झाला.

२) शाळांची संख्या पंधरा वर्षात पावणेतीन पटीने वाढली.

३) शिक्षणावरील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष खर्चात वाढ झाली. प्राथमिक शिक्षणाचा होणारा खर्च तिपटीपेक्षा अधिक पटीने वाढला. विद्यार्थ्यामागे होणारा खर्च दीडपटीने वाढला.

४) मागासलेल्या वर्गाच्या मुलांना शैक्षणिक सवलती मिळाल्या.

५) हुशार मुलांसाठी पब्लिक स्कूल काढले तर भटक्या जमातीच्या मुलांसाठी आश्रमशाळा काढल्या.

१९४७-५० मध्ये प्राथमिक शिक्षणाने खूपच पल्ला गाठला. परंतु १९५१-५२ मध्ये मुलांच्या शेकडेवारीत एकदम घट झाली. कारण दंड नाममात्र असल्यामुळे पालक मुलांना शाळेत पाठविण्यास टाळाटाळ करु लागले.

**१९६५-७३ या काळात प्राथमिक शिक्षणात भारताने केलेली प्रगती.**

१९६५-६६ मध्ये इयत्ता १ली मध्ये ६ ते ११ वयोगटात ७६-७८ टक्के नोंदणी झाली ती ७८-७९ मध्ये ९७.१ झाली. पण त्याचवेळी ६ ते ८ वयोगटात व ११ ते १४ वयोगटामधील नोंदणी ३०.९ शेकडा व ४७.१ शेकडा होती.

५व्या योजनेत शैक्षणिक दृष्ट्या अविकसित असलेले विभाग व लोक यांचा विचार करण्यात आला. त्यासाठी क्रमिक पुस्तके, लेखन साहित्य व मधल्या वेळेचे जेवण मोफत पुरवण्याची योजना होती. मुलींना मोफत गणवेष देऊन उपस्थिती शिष्यवृत्ती देण्याची प्रथा होती. आश्रम शाळा वाढविण्याची ही योजना होती.

**प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारातील अडचणी व उपाय**

१) १९८० ते ८५ मध्ये ८ कोटी विद्यार्थी १ ते ४ इयत्तेत शिक्षण घेत होते. तर इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये ४.९कोटी.

२) अपव्यय (गळती)- आपल्या देशातील ७० टक्के मुले त्यांचे प्राथमिक शिक्षण ठरलेल्या मुदतीत पूर्ण करू शकत नाहीत. याची दोन प्रमुख कारणे म्हणजे अपव्यय व स्थगन.

मुलांनी मध्येच शाळा सोडली तर त्याच्यावर खर्च झालेला पैसा व मानवी प्रयत्न वाया गेले असे म्हणावे लागते. प्राथमिक शिक्षणावर खर्च होणारा कितीतरी पैसा व मानवी प्रयत्न असफल होतात. आपल्यासारख्या विकसनशील देशाला हे परवडण्यासारखा नाही.

**अपव्यय किंवा गळती ही दोन प्रकारे होत असते.**

**१) परिस्थितीजन्य २) स्थगनजन्य :** एखादा मुलगा गैरहजर म्हणून काढून टाकला तर त्याला परिस्थितीजन्य गळती म्हणता येईल. मात्र एकाच वर्गात २-३ वेळा नापास झाल्यामुळे एखाद्या मुलाने शाळा सोडली त्याला स्थगनजन्य गळती म्हणावे लागेल.

**अपव्ययाची कारणे :**

**१) प्रशासकीय कारणे :** सक्तीपत्र-नोटीसा बजावणे, दंड करणे इत्यादी गोष्टी अनेकविध कारणास्तव फारशा पद्धतशीरपणे होऊ शकल्या नाहीत. गैरहजर मुलांची चौकशी करणे ह्या गोष्टीसही दिरंगाई होते.

**२) आर्थिक कारणे :** गरीब पालकांना मुलांचा शेतीकामासाठी व मुलींचा घरकामासाठी उपयोग आवश्यक असल्याने मुलामुलींना शाळेत पाठविणे अगर नियमितपणे पाठवणे कठीण असते. काहींना तर अंगावर कपडे, पाटी-पुस्तके हाही खर्च आवाक्याबाहेर असतो.

---

**३) सामाजिक कारणे :** परंपरागत कल्पनांमुळे मुलींच्या शिक्षणाबाबत उदासीन. ग्रामीण पालकांना मुलींनी मुलांबरोबर शिकावे हे पसंत नसते.

१९०१ मध्ये निम्न प्राथमिक शाळेत दर १०० मुलांमागे १२ मुली शिक्षण घेत होत्या. १९५० मध्ये हे प्रमाण ३९ पर्यंत व इ.स. १९६५ पर्यंत हे ५० पर्यंत आले. ६ ते ११ या वयोगटातील लाखो मुली आजही शाळेत पोचलेल्या नाहीत.

**४) परिस्थितीजन्य कारणे :** मुलांचे घर व शाळा यांतील अंतर फार असू नये.

**५) शालेय कारणे :** शाळांचा परिसर विद्यार्थ्यांना आकर्षित करत नाही. विविध दृक श्राव्य साधनांचा कृतिपर अध्यापन पद्धतीचा वापर पाहिजे म्हणजे मुले शाळेत रमतील.

शाळेची वेळ, सुट्या, स्थानिक परिस्थिती गरजेप्रमाणे हव्या.

६) तपासणी व पर्यवेक्षण न झाल्यामुळे शिक्षकांना मार्गदर्शन मिळत नाही.

७) मुलांचे निकृष्ट आरोग्य, उत्साह व शक्ती नसल्यामुळे असमाधानकारक अभ्यास. असमान वयाच्या वर्गातील मुलांमुळे अध्यापन समान रितीने आवड निर्माण करीत नाही.

अपव्ययाची सात कारणे कारणीभूत असलेली परिस्थिती बदलणे हाच यावर उपाय आहे.

**स्थगिती** (Stagnation)

विद्यार्थ्याला एका इयत्तेत एकाहून अधिक वर्षे रहावे लागणे यालाच स्थगिती म्हणता येईल.

इ.१ली त स्थगितीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. ते दुसऱ्या इयत्तेत पुष्कळच कमी होते. आणि ३री व ४थी त तसेच रहाते. उच्च माध्यमिक स्तरावर ते आणखी कमी होते.

मुलांपेक्षा मुलींमध्ये हे स्थगितीचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

विविध राज्यात स्थगितीचे प्रमाण वेगवेगळे आहे.

१) कौटुंबिक परिस्थिती (घरामध्ये परिस्थितीमुळे वातावरणाबद्दल उदासीनता किंवा वातावरणच नसणे.)

२) अनियमित हजेरी. (आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कौटुंबिक अडचणींमुळे)

३) प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता

४) अध्यापन साहित्याचा अभाव

५) शाळेची कोंदट, पुरेसा उजेड, हवा नसलेली, क्रीडांगण नसलेली इमारत

६) अननुभवी व अल्पशिक्षित एक शिक्षिकी शाळा

७) भटक्या जमाती वगैरे स्थगितीची कारणे आहेत.

**यावर उपाय**

१) आर्थिक परिस्थिती सुधारणे, २) शासनाकडून अध्यापन साहित्याचा पुरवठा, ३) प्रशिक्षण विद्यालये वाढविणे, ४) प्रशिक्षित, श्रद्धावान शिक्षक एक शिक्षकी शाळांतून नेमणे, ५) समाज शिक्षणाद्वारे पालकांची उदासीनता घालवणे, ६) एक शिक्षकी शाळा जवळच्या मिडल स्कूलला जोडणे, ७) भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रम शाळा व वसतिगृहांच्या सोयी ८) दर्जेदार शिक्षणाने गुणवत्ता वाढवणे. वगैरे

---

भित्र्यांना सारेच अशक्य वाटते.

**कोठारी आयोगाच्या शिफारशी**

१) इयत्ता पहिलीच्या वर्गातील मुलांमधील कालिक वयोभिन्नता कमी करणे.

२) पहिलीची परीक्षा रद्द करुन पहिली व दुसरी या दोन इयत्ता म्हणजे एकच अध्यापन घटक मानावा.

३) पहिलीमध्ये क्रीडन पद्धतीचा अवलंब करावा.

४) गळती कमी करण्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय करणे.

५) अपुऱ्या साक्षरतेमुळे हळूहळू येणारी निरक्षरता टाळण्यासाठी ११ ते १४ वयोगटातील जी मुले प्राथमिक शाळेत जात नसतील त्यांनी एका वर्षाच्या साक्षरतेच्या वर्गास हजर रहाणे आवश्यक ठरवावे.

६) निम्न प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या परंतु आर्थिक कारणामुळे पुढील प्राथमिक शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अंशकालीन स्ववेळ (Own Time) अभ्यासक्रमाची व्यवस्था करावी.

७) मुलींच्या शिक्षणाबाबत जनमत जागृत करावे.

८) शिक्षकांची संख्या वाढवावी.

९) शाळेसाठी आवश्यक अध्ययन साहित्य व जरुर तर कपडे मुलींना मोफत द्यावेत.

१०) ११ ते १३ वयोगटातील ज्या मुलींना शाळेत येणे शक्य नसेल त्यांच्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय.

११) आदिवासी विभागात काम करणाऱ्या शिक्षकांना अधिक पगार व निवासाची सोय.

१२) आश्रमशाळा अधिक प्रमाणावर स्थापन करणे.

१३) घटनेतील उद्दीष्ट पुरे करण्याच्या दृष्टीने गरीब व कमी विकास झालेल्या राज्यांना केंद्राने विशेष अनुदान द्यावे.

१४) प्राथमिक शिक्षकांचा दर्जा वाढविणे.

१५) देशभर शाळांची दर्जा सुधार मोहीम हाती घेतली जावी.

वरील परिस्थिती सुधारण्याच्या आधीच २१व्या शतकाकडे माहिती तंत्रज्ञानाच्या द्वारे जाण्याची घाई झालेल्या महाराष्ट्र सरकारने २९ डिसेंबर १९९९ रोजी प्राथमिक शाळांमधून पहिल्या इयत्तेपासून जून २००० पासून इंग्रजी विषय शिकविण्याचा निर्णय घेतला आहे.

**श्री. अ.धों. टिल्लू**

कार्याध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

• • •

**With Best Compliments From**

A

Well

Wisher

आयुष्याच्या वादळी समुद्रात मार्ग दाखविणारी तारका म्हणजे आशा.

# एक आगळं-वेगळं विश्लेषणतंत्र

प्रा. सौ. सुषमा पौंडवाल,
उपग्रंथपाल,
ना.दा.ठा.महिला विद्यापीठ, जुहू

*(-आधुनिक माहिती तंत्रज्ञान प्रधान युगात व्यवस्थापन शास्त्राला विलक्षण महत्त्व येत आहे. या दृष्टीने व्यवस्थापन शास्त्रातील SWOT ANALYSIS या तंत्राबाबतची कल्पना स्पष्ट करणारा लेख येथे देत आहोत. -संपादक)*

व्यवस्थापनशास्त्रात संस्थेच्या वा व्यवस्थापकीय कार्यनियोजनाबाबत व्यवस्थापनतज्ज्ञांनी स्वॉट ॲनलिसिस (शत्रुसंधो) या विश्लेषणतंत्राचा वापर केला आहे. हे तंत्र कोणत्याही कामाची आखणी करण्यापूर्वी तसेच वैयक्तिक पातळीवरही मूल्यामापनाबाबत उपयुक्त ठरणारे आहे. शैक्षणिक क्षेत्रातही एक अभ्यासपद्धती म्हणून या तंत्राचा स्वीकार व वापर करणे आवश्यक वाटते. त्यामुळे आजच्या स्पर्धात्मक जगात संस्थेचा दर्जा सुधारणे तसेच तिची गुणवत्ता वाढविणे या दृष्टीने विचाराला दिशा देणे सुकर होण्यासारखे आहे. प्रस्तुत लेखात या विश्लेषणतंत्राबद्दल माहिती देऊन शैक्षणिक संस्थांच्या विकासाच्या वाटचालीत तसेच वैयक्तिक मूल्यमापनासाठीही त्याचा कसा वापर करता येईल त्याची शक्यता उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

'स्वॉट' (शुत्रसंधो) ही संकल्पना त्या शब्दसंहतीच्या प्रत्येक घटकाच्या आद्याक्षरांवरून तयार केलेली आहे. ती अशी-

१) S- Strengths शक्तिस्थाने/बलस्थाने
२) W-Weaknesses त्रुटी/उणीवा
३) O-Opportunities संधी
४) T-Threats धोके

प्रसिद्ध व्यवस्थापनतज्ज्ञ शरु रांगणेकर यांच्या 'व्यवस्थापनाची मूलतत्त्वे' या विश्लेषणपद्धतीचा 'साकसंधो' असा उल्लेख आढळतो. येथे Strengths साठी सामर्थ्य, Weaknesses साठी कमजोरी, तसेच व Opportunities व Threats साठी वर उल्लेखिलेले शब्द वापरले आहेत. निगम नियोजनासाठी (Corporate planning) रांगणेकरांनी या विश्लेषणाचे महत्त्व लक्षात घेतले आहे [१].

या संकल्पनेतील शक्तिस्थाने व त्रुटी हे घटक अन्तर्गत बाबींशी संबद्ध असून संधी व धोके हे बाह्य जगताशी संबंधीत आहेत. नियोजन करतेवेळी संस्थेची शक्तिस्थाने तसेच संस्थेतील 'उणीवा' वा त्रुटी जाणून घेतल्यास, त्यावर चर्चा घडवून आणल्यास नियोजनाला योग्य ती दिशा देणे शक्य होते. उदाहरणार्थ, संगणकाविषयी प्रशिक्षण घेतलेला कर्मचारीवर्ग हे एखाद्या संस्थेचे बलस्थान ठरू शकतो. अशी बलस्थाने ओळखून नंतर या शक्तींचे संवर्धन करण्यासाठी प्राचार्यांना पुढची पावले उचलणे सोपे जाते. पैशाची कमतरता ही एखाद्या संस्थेची उणीव असल्यास ती ओळखून त्यावर तोडगा शोधणेही प्राचार्यांना शक्य होते. सेवांचे विपणन (Marketing) किंवा समाजातील दानशूर व्यक्तींना पैसे उभे करण्यासाठी आव्हान करणे, एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करणे इत्यादी उपाय

त्यांना वेळेवर योजता येतात. परंतु जर अशा त्रुटींकडे डोळेझाक करायची असे ठरवले तर संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ते धोक्याचे ठरेल.

'शत्रुसंधो' या संकल्पनेतील 'शत्रु' अशा तऱ्हेने व्यवस्थापनातील नियोजनकार्याला दिशा व चालना देतो. संस्थेची जागा, इमारत, तेथील वातावरण, कर्मचारीवर्ग, पैसा, यंत्रसामुग्री व शैक्षणिक साधने इत्यादी गोष्टींचा विचार या दोन घटकांच्या संदर्भात करणे आवश्यक ठरेल.

संधी व धोके हे बाह्य जगताशी संबंधित घटक असून त्यांवर व्यवस्थापकाचे नियंत्रण नसते. आजच्या बदलत्या वातावरणातील संधी ओळखून त्यांचा उपयोग करून घेणे तसेच धोके जाणून त्यांच्याशी मुकाबला करण्यास सज्ज राहणे, आवश्यक असते. उदाहरणार्थ विद्यापीठ अनुदान आयोगाचे सढळ हस्ते अनुदान देण्याचे एखाद्या वर्षीचे धोरण ओळखून प्राचार्यांना आपल्या महाविद्यालयासाठी एखाद्या प्रकल्पाची आखणी करून भरपूर अनुदान मिळवता येईल. म्हणजेच संस्थेबाहेर अस्तित्वात असलेल्या संधीचा फायदा घेणे कित्येकदा संस्थेच्या विस्तारासाठी व पुढील विकासासाठी आवश्यक व उपयुक्त ठरते. स्पर्धात्मक जगातील प्रत्येक बाबीतील जीवघेणी स्पर्धा प्राचार्यांनाही बरेचदा धोक्याचा कंदील दाखवीत असते. म्हणूनच बाह्य जगातील धोके ओळखून पावले उचलणे अगत्याचे ठरते. उदाहरणार्थ, जवळच्या महाविद्यालयाने 'युवा-महोत्सव' आयोजित करून त्याला इतर महाविद्यालयांनी प्रचंड प्रतिसाद दिला असल्यास अशा कार्यक्रमांचे योग्य मूल्यमापन करून विचारांती आपल्या संस्थेच्या ध्येयधोरणानुसार आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे किंवा इतर कार्यक्रमांचे आयोजन करून वेगळ्या प्रकारे आपले अस्तित्व सिद्ध करणे आवश्यक ठरेल.

वरील विवरणावरून लक्षात येईल की या विश्लेषणतंत्राचा दुहेरी उपयोग करता येईल. संस्थेची शक्तिस्थाने व सामर्थ्ये जाणून ती जाणीवपूर्वक जोपासणे व वाढवणे, त्रुटी वा कमतरता जाणवून त्या कमी करणे-तसेच धोके ओळखून त्यांचा मुकाबला करून त्यावर उपाययोजना केल्याने व्यवस्थापकाला आपले नियोजन अधिक जाणीवपूर्वक व शिस्तबद्ध पद्धतीने करता येते. यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की 'शत्रुसंधो' तील वेगवेगळ्या घटकांची वेगवेगळी संरचना केल्याने अग्रक्रमाची धोरणे ठरवून संस्थेला विकासाची वाट दाखवता येईल.

कुंझ व वेहरिच या व्यवस्थापनतज्ज्ञांनी 'शत्रुसंधो' मधील वेगवेगळ्या घटकांच्या कमी-अधिक मिश्रणाने व्यवस्थापकाला नियोजनाबाबत मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे'. या संयोगामुळे त्यांनी 'शत्रुसंधो' च्या निर्माण होणाऱ्या विविध व्यूहरचनांचा लवचिक वापर कसा करता येईल ते पुढील आकृतीद्वारा समर्पकपणे मांडले आहे-

| अन्तर्गत घटक / बाह्य घटक (जास्तीत जास्त) | अन्तर्गत शक्तिस्थाने श जास्तीत जास्त | अन्तर्गत त्रुटी त्रु |
|---|---|---|
| बाह्य संधी सं | (१) श-सं जास्त-जास्त | (२) त्रुसं कमी-जास्त |
| बाह्य धोके धो | (३) श-धो जास्त-कमी | (४) त्रुधो कमी-कमी |

जास्तीत जास्त — कमीत-कमी (डावीकडे); कमीत-कमी — कमीत-कमी (उजवीकडे)

यातील श-सं ही पहिली संरचना पाहिली तर शक्तिस्थाने जास्तीत जास्त सबळ करून त्याबरोबर संधींचाही जास्तीत जास्त उपयोग करून हे दोन घटक परस्परपूरक करता येतात. उदाहरणार्थ सक्षम कर्मचारी व सेवकवर्ग (श) आणि विविध प्रकल्पांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या अर्ज करण्याच्या पद्धती यांच्या संयोगाने चांगली योजना आकाराला येऊ शकते.

पक्षी जो उडतो नभात तो मनाचा दूत माझ्या

दुसरी त्रु-सं ही संरचना त्रुटी कमी करण्यासाठी संधींचा योग्य व जास्तीत जास्त वापर सुचवते. उदाहरणार्थ, संगणक प्रशिक्षणाची संधी सहज उपलब्ध असल्यास कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावयास हवे. तिसऱ्या संरचनेत सामर्थ्य वाढवून धोके कमी करण्याचा प्रस्ताव मांडला गेला आहे. आधी घेतलेल्या उदाहरणात युवा-महोत्सव आयोजित करणे शक्य नसल्यास आणि उत्तम क्रीडा प्रशिक्षक संस्थेत उपलब्ध असल्यास या क्रीडा प्रशिक्षकांना वाव देऊन (श), अभ्यासेतर क्रीडाविषयक कार्यक्रम राबविता येतील. किंवा क्रीडा-महोत्सव आयोजित करता येईल. चौथ्या संरचनेनुसार त्रुटी कमी करून धोकेही कमी करता येतील. उदाहरणार्थ, महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री व शैक्षणिक साधने कमी असल्यास आर्थिक तरतूद करताना या गोष्टींना अग्रक्रम देऊन ती विकत घेता येतील. म्हणजेच त्रुटी कमी करून तांत्रिक युगासाठी तयार राहून महाविद्यालयाला पुढचे मोठे धोकेही टाळता येतील. काळाबरोबर पावले उचलता येतील.

या सर्व विवेचनाच्या अंती ही विश्लेषणपद्धती काय साधते ? असा प्रश्न विचारला तर संस्थेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी ती साधते असे उत्तर मिळेल. एक तर प्रशासकाला मागील निर्णयांचे व कृतीचे सिंहावलोकन करता येईल. त्याचा फायदा पुढील नियोजनात होईल. दुसरे म्हणजे अन्तर्गत व बाह्य शक्ती, तसेच फायद्यातोट्या त्याचा विचार करून दूरदर्शीपणे धोरणे आखणे त्याला शक्य होईल.

केवळ एवढेच नव्हे तर हीच विश्लेषणपद्धती व्यक्तीला आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्वविकासासाठी व मूल्यामापनासाठी उपयोगी पडणारी आहे. आपली बलस्थाने ओळखून ती वाढवणे, त्रुटी ओळखून त्या कमी वा नाहीशा करण्याचा प्रयत्न करणे, संधी पाहून त्यांचा योग्य वापर करणे. तसेच धोके ओळखून इतर गोष्टींसह त्यांच्याशी मुकाबला करण्यास सज्ज होणे हे २१व्या शतकातील व्यवस्थापकाला अत्यंत आवश्यक आहे. 'शत्रुसंधो' या आगळ्या वेगळ्या विश्लेषणामुळे त्याची स्वतःची तसेच संस्थेच्या विकासाची वाटचाल सुकर होईल हे निश्चित.

संदर्भ :


१) रांगणेकर शरु (१९९७) व्यवस्थापनाची मूलतत्वे अनु. प्रकाश आल्मेडा, मुंबई, रांगणेकर असोसिएटस्.

२) कुंझ हॅरॉल्ड व वेहरिच, हॅं. (१९८८) : मॅनेजमेंट. न्यूयॉर्क, मॅग्रोहिल.



**प्रा. सौ. सुषमा पौडवाल**

१२/ब, शततारका,आर.टी.ओ. समोर,
चार बंगला, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३.


• • •


With Best Compliments from

VINAYAK MEDICAL
&
GENERAL STORES

Sai Sadan, Shop No. 2,
Ganesh Cinema Compound,
Thane (w) 400 602.

# “ माणसातला ‘कवी’ बेपत्ता ” ......

कु. शिल्पा ल. पाटील

*( माणसातला कवी हरवला की जीवनाचे काव्यच संपते. विज्ञान महाविद्यालयातील संवेदनक्षम मन असणाऱ्या शिल्पाला हे कसं जाणवतय पहा. - संपादक)*

आनंदकंद परमेश्वराने आपल्या आनंदाच्या भरात हे चित्रविचित्र जग उत्पन्न केले. या परमेश्वराच्या रचनेत सर्व दृष्टींने विशेषत्वेकरुन मनुष्याचा अधिकार अधिक असल्याचा दिसून येतो. कारण त्याला आनंद-दुःख या सारख्या भावना आहेत. त्या तो प्रकट करु शकतो इतर पशूपक्षांपेक्षाही त्यांच्या ठिकाणी जाणीवेचा अंश अधिक असल्याचा दिसून येतो आणि त्यामुळे तो सतत स्वतःच्या प्रगतीत गुंतलेला दिसून येतो.

या प्रगतीच्या टप्प्यात भावनांच्या प्रकटीकरणासाठी त्याने सृजनतेचा आधार घेतला. जी भाषा डोळ्यांनी बोलली जात होतो, जी भावना स्पर्शाने व्यक्त केली जात होती ती नट अभिनयातून व्यक्त करू लागला. शिल्पकार आपल्या शिल्पातून व्यक्त करू लागला. चित्रकार आपल्या चित्रातून व्यक्त करू लागला. तर लेखक आपल्या लेखनातून व कवी आपल्या कवितेतून व्यक्त करू लागला.

हा कवी म्हणजे कोणी वेगळा नसतो. तुमच्या आमच्यातलाच कवी असतो. कारण कवी म्हणजे माणसातील संवेदन क्षमता, सौंदर्याचा आस्वाद घेण्याची वृत्ती, इतरांच्या भावनांना प्रतिसाद देण्याची वृत्ती, म्हणजेच भावनिक पातळीवरचे आपले जीवन, जे काव्यातून व्यक्त होते. हे काव्य म्हणजे आत्म्यांच गाणं, उत्कट भावनांचा अद्‌भूत आविष्कार. क्रौंच पक्ष्याची वेदना रामायणासारख्या महाकाव्याला जन्म देऊन गेली. तेव्हा वेदनेचे गाणे म्हणजे काव्य. अहो कविता म्हणजे

कविता म्हणजे-

पावसात अखंड भिजत राहणे
चंद्राच्या प्रकाशात चिंब न्हाणे.

कविता म्हणजे-

तिचं अलगद येणं, हातात हात देऊन,
गुपित सांगून जाणं

कविता म्हणजे-

फुलपाखरांचं जिणं
वाऱ्यावर उडून जगाला रंग देणं

कविता म्हणजे -

डोळ्यातंल पाणी,
मनातील गाणी

पण अलीकडच्या काळात ही गाणीच हरवली आहेत, काव्य बेपत्ता झालंय. अनुषंगाने माणसातला कवी बेपत्ता झालाय. सकाळी निसर्गाच्या संगीताने, पक्ष्यांनी गायलेल्या भूपाळीने जग जागे व्हायचे. आज मात्र जग घड्याळ्याच्या यांत्रिक नादाने जागे होते आणि पुन्हा झोपेपर्यंत त्या घड्याळ्याच्या काट्यासोबत फिरत रहाते, स्वतःतली सजीवता हरवून यंत्रमय जीवन जगत असते.

काव्य हे श्रम विसरायला लावत. म्हणूनच याआधी मोटेच गाणं होतं, एखादं पेरणीचं गाणं होतं पण आजच्या यंत्र युगात जेव्हा यांत्रिक मोटारच सार पाणी उपसून टाकते

---

तेव्हा मोटेच गाणं कसलं ? हजारो हेक्टर जमिनीची पेरणी ट्रॅक्टर करतय तेव्हा पेरणीच गाणं कसलं ? धान्य कुटण्यापासून दळण्यापर्यंत, भाकरी करण्यापर्यंत गाणी होती पण आजच्या फुड प्रोसेसरने मिक्सरने, रोटी मेकरने आमच्या भावनांचा आविष्कार होण्याचे मार्गच गोठवले आहेत.

आपल्याकडे डोहाळ जेवणापासून, पाचवी, बारसे, मुंज, लग्न या समारंभाची वेगवेगळी गाणी आहेत. अगदी मृत्यूनंतरची विराणीही आमच्याकडे आहे. त्यामुळे गाणं हे हे आमच्या जन्मापासून -मरणापर्यंत सोबत करते. हे जीवनाचे सुरेल गाणे आम्ही मात्र रडगाणे केलय.

पूर्वी काव्य गेय होतं त्यामुळे रोमारोमात संचारलेल होतं. पण आजच्या नवकाव्यात विषय आहे, आशय आहे, नाद मात्र नाही. स्पर्धासोडून काव्यसंमेलनातील उपस्थिती हरवली आहे कारण रसिकांचाच आभाव आहे. वेदांपासून सार साहित्य, तत्त्वज्ञान काव्यातच आहे. हे काव्यच हरवलयं त्यामुळे साहजिकच तत्त्वांचा विसर पडलाय हे जीवन नष्ट होताना दिसतयं. निसर्गाचा आस्वाद घ्यायला कोणाला फुरसतच नाही. ए.सी.त बसणाऱ्या माणसांना वाऱ्यावर -भिरभिरणाऱ्या गारव्याची काय कल्पना? नद्या, नाले, वने यांची फक्त उपयुक्तता महत्त्वाची ठरते आणि मग माणसाच्या जीवनातले काव्य संपते.

पावसात चिंब भिजण्यापेक्षा आजचा माणूस घरात रहाण पसंत करतो. किनाऱ्यावरच्या वाळूत चालताना चपलेचा अडसर मध्ये ठेवतो, वटवृक्षापेक्षा बोन्साय पसंत करतो. या चाकोरीबद्ध संस्कृतीत अडकून स्वतःतला कवी स्वतःच हरवतो.

बरं, हे काव्य काही फक्त शब्दांपर्यंत मर्यादित नाही. मानवी सौंदर्यातही काव्य आहे, कोमल भावना काव्य आहेत, जवळची नाती काव्य आहेत. तुमच्या माझ्यातले संवाद काव्य आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी चार भिंतीच्या चौकटीत हे काव्यही हरवलं आहे. माणसातला कवी बेपत्ता झालाय.

मानवी सौंदर्याची अनेक पातळीवर दुर्दशा होतेय. सुंदर बालक किंवा स्त्री/पुरुष जाहिरातीद्वारे आपल्या रुपाचे व्यापारीकरण करतायत. इतरांना त्या सौंदर्याचा द्वेष वाटतो तो इतका की एखाद्या स्त्रीने प्रेमाला प्रतिसाद न दिल्यास हत्येपर्यंत मजल जाते.

इतरांच्या भावनांची कदर राहिलेली नाही. कारण स्पर्धाच इतकी जीवघेणी झालीय की स्वतःच्या अस्तित्वासाठीच दुसऱ्यावर अन्याय होतोय. चंगळवादाच्या प्रभावामुळे आयुष्यातील कोमल भावनांना वाव रहात नाही. आईने खपून घरी केलेल्या लाडू पेक्षा मुलांना वाढदिवसाला केकच हवा असतो.

संवेदना-क्षम मनुष्य भावडा आणि बावळट गणला जातो. इतरांची पर्वा करणे हे आधुनिक संस्कृतीत बसत नाही. जवळची नाती दूर जातात, रुक्ष होतात. कुटुंबातील व्यक्तींना संवाद साधण कठीण झालयं. प्रेमाची प्रतीके सुद्धा बदलली आहेत. 'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे !" किती अशक्य वाटतयं हे !!

माणसातल्या काव्याची अखेर म्हणजे आज सर्वत्र पसरलेला हिंसाचार . कुठल्याही तऱ्हेने कमजोर असलेल्या व्यक्तींना मग ती लहान मुले असोत, वा स्त्रिया असोत वा दलित असोत की जगातील गरीब जनता असो, बिनदिक्कतपणे त्यांची शिकार केली जाते.

तेव्हा चंगळवाद, रुक्ष व्यवहारवाद, स्पर्धा या काहिलितून माणसाला वाचवणारे एक गारव्याचे झाड आहे ते म्हणजे त्याच्यातलाच 'कवी'.

**कु. शिल्पा ल. पाटील**
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
एस्.वाय्.बी.एस्.सी.

• • •

---

रुपं पावसाची किती रिमझिम रिमझिम । आणि पहाता पाहता मुसळासारखीच धार

# 'रिंकु पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे....
# आपण कोठे चुकतो ?

**पद्मा सुर्वे - भाटकर**

*( कोवळ्या वयात एकतर्फी प्रेमभावनेच्या अतिरेकातून मुलींच्या होणाऱ्या हत्या हा प्रश्न गंभीर होत चालला आहे. थोडं थांबून, यामागील कारणांचा विचार लेखिकेने या लेखात केला आहे.- संपादक)*

वर्तमानपत्र उघडले की बऱ्याचदा अंगावर शहारा आणणाऱ्या बातम्या वाचायला मिळतात. आज एखाद्या रिंकू पाटीलची, तर उद्या अमृता देशपांडेची, तर परवा एखाद्या नीता हेंद्रेची. एकविसावं शतक उंबरठ्यावर येऊन ठेपलयं. विज्ञानाने चौफेर प्रगती केली आहे. पण मानवता, माणुसकी हद्पार होत चालली आहे. ही बाब समाजाच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

रिंकू पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे आणि यासारखीच अनेक प्रकरणे काय सुचवितात ? कशाचे प्रतीक आहे हे ? समाजाच्या अध:पतनाचं ? शौर्याच्या गाथा सांगणाऱ्या आपल्या महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत हे घडावं याहून दुर्दैव ते कोणतं ? काय कारणे असावीत या मागे ? बदलेली सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती याला कारणीभूत असावी.

एकत्र कुटुंब पद्धती मोडीत निघाली आहे. कुटुंब व्यवस्था कोलमडली आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे 'आजी-आजोबा' अडगळीत जमा झालेत. सर्वच नाती एकमेकांपासून दुरावली. मामा, मावशी, काका, काकू ही नाती केवळ 'दिखाऊ' राहिलीत.

आई-वडिल चाकरमानी. घरात केवळ मुलांचे राज्य. दिवसभर आई मुलांपासून दूर रहाते. मुलांसाठी आपण वेळ देऊ शकत नाही, या 'अपराधीपणाच्या जाणीवेतून' मुलाचे हट्ट तत्परतेने पुरवले जातात. मुलेही या परिस्थितीचा पुरेपुर फायदा घेतात आणि आई-वडिलांना 'इमोशनली ब्लॅकमेल' करतात.

पूर्वी कधी 'संस्काराचे वर्ग' असतात हे ऐकले नव्हते. आजकाल मुलांना संस्कार वर्गात घातलं जात. मुळात 'संस्कार' ही गोष्ट ठराविक वेळेवर मुलांना पुढ्यात घेऊन शिकविण्याची नाही. आपल्या आचरणातून, विचारातून येता-जाता सहजपणे, उत्सफूर्तपणे पोहचली पाहिजे. मुले चुकत असतील तर काय चुकलं, का चुकलं ? याचा अभ्यास पालकांनी केला पाहिजे. मुलांना नीट समजवून घेतलं पाहिजे. त्यांच्याशी योग्य संवाद साधला पाहिजे.

पालकांनी मुलांना दिवसाकाठी थोडा वेळ दिलाच पाहिजे. 'मला वेळ नाही', 'असले फालतू प्रश्न विचारत जाऊ नकोस ', 'आमच्यावेळेला असं नव्हतं' असं म्हणून टाळू नये. खास करून मुलं जेव्हा वयात येत असतात त्यावेळी मुलांशी 'सुसंवाद' साधला पाहिजे. अलिकडे मुलं लवकर वयात येतात. अगदी दहाव्या, अकराव्या वर्षीच. पण मानसिकता, भावनिक क्षमता वाढलेली नसते.

पालकांशी मुलांचा संवाद तुटल्यामुळे टी.व्ही. सारख्या माध्यमाने दोघांमध्ये मोठी दरी निर्माण केली आहे. निव्वळ सिनेमा पाहून मुल बिघडतात, प्रसारमाध्यमे त्यांच्यावर वाईट परिणाम करतात किंवा या घटना 'डर' सारखे चित्रपट पाहून घडतात असं म्हणता येणार नाही. मुलांनी जर तो चित्रपट पाहिला तर त्यावर पालकांनी स्वत: मुलांबरोबर चर्चा करावी. तो चित्रपट पाहून त्याला काय वाटलं ते विचारावे. शाहरुखखानची भूमिका नकारात्मक आहे, ती कोणत्या परिस्थितीत आहे याची चर्चा करीत वास्तवाची जाणीव करुन द्यावी. निव्वळ माध्यमांना दोषी ठरवू नये.

---

मूल सर्वांत पहिला शब्द उच्चारते तेव्हा 'आई' म्हणते.

आपला समाज पुरुषप्रधान आहे. आपली संस्कृती पुरुषी मानसिकतेला खतपाणी घालणारी. 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' मुलाला हवे ते मिळालेच पाहिजे. त्याला अगदी खास वागणूक. यामुळे त्यांना आपण कोणीतरी वेगळे आहोत असे वाटायला लागते. त्याला होणाऱ्या जाणीवेतून पुढे हवं ते मिळवायचचं हा अट्टाहास निर्माण होतो. त्याला रिंकू पाटील, अमृता, नीता सारख्या निष्पाप कळ्या बळी पडतात. ही मुलगी मला नकार देते म्हणजे काय ? आणि त्यातूनच मग टोकाची भूमिका घेतली जाते.

पालकांनी मुलांना 'नकार' ऐकायची सवय लावावी. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये पालकानंतर मुलांवर अग्रक्रमाने शिक्षकच संस्कार करीत असतात. शिक्षकांनी केवळ ज्ञानार्जनापुरते विद्यार्थ्यांशी संबंध न ठेवता आत्मीयतेने मुलांच्या अडचणी, त्यांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत. पूर्वी गुरुजींना (शिक्षकांना) मुलांच्या बाबतीत बरेच अधिकार दिले जायचे. त्यावेळी विद्यार्थ्याला गुरुजींनी 'ठोकल' तरी खपून जायचे. त्यावेळी पालकांनी कधी मुलांची बाजू घेतली नसेल.

परंतु आता पूर्वीचे निकष लावता येणार नाहीत. मुले चुकली आणि शिक्षकांनी जाब विचारला तर मुले शिक्षकांना 'गेटबाहेर भेटा मग दाखवतो' असे सांगतील. आणि पालकही शिक्षकांना जाब विचारतील. असे असले तरी शिक्षकांनी आपल्या भूमिकेशी ठाम राहिले पाहिजे.

केवळ पालक आणि शिक्षकांवर जबाबदारी सोपविली की संपत नाही. प्रत्येक नागरिकाने अशा प्रसंगी 'बघ्याची' भूमिका न घेता जागरुकता दाखविली पाहिजे. अमृता देशपांडेवर सांगलीमध्ये भर रस्त्यात चाकूचे वार होत असताना एकही माणूस पुढे आला नाही. एरव्ही 'पौरुषत्वाचे' पोवाडे गाणाऱ्या आपल्या समाजात एकही 'पुरुष' पुढे येऊ नये याचे वैषम्य वाटते. एका तरी नागरिकाने पुढे होऊन वार करणाऱ्याला रोखले असते तर नक्कीच दुर्दैवी अमृताचा जीव वाचला असता.

फक्त 'माध्यम' या घटनेला जबाबदार नाहीत. पण माध्यमांनी या घटनांचा वेडा वाकडा प्रचार करू नये, ज्याने इतरांची भीड चेपली जाईल. याउलट अशा घटनेतील आरोपींना कशी शिक्षा ठोठवण्यात आली याच वर्णन ठळकपणे करावे. ज्यामुळे इतरांना दहशत बसेल, अशा घटनांना आळा बसेल.

पालकांनी मुलांना चांगल साहित्य वाचण्याची सवय लावावी. उच्च अभिरूची मुलांमध्ये निर्माण करावी. यासाठी पालकांनी स्वतःच अनुभवविश्व समृद्ध करावं. शाळांमधून आठवड्यातून एखादा तास चांगल्या साहित्य वाचनासाठी असावा. सक्तीने असे वाचन करून घ्यावे. पालकांनी एखाद्या चांगल्या नाटक, सिनेमा, पुस्तकांवर मुलांबरोबर चर्चा करावी. जेव्हा मुलांना प्रश्न पडतील तेव्हा त्या वयानुसार त्यांच्या शंकांचे निरसन करावे.

नागरिक उदासीन झाले आहेत. समाज भयमुक्त झाला पाहिजे. रात्री केव्हाही फिरण्याएवढा विश्वास प्रत्येक नागरिकाला वाटला पाहिजे.

पालकांनी मुलींना स्वरक्षणाचे धडे द्यावेत. तू मुलगी आहेस असं तिच्या मनावर ठसवून तिला मानसिकरित्या कमजोर करू नये.

शाळांमधून वर्षातून एकदा तरी सर्व मुलांची तपासणी सक्तीने मानसोपचारतज्ज्ञांकडून करून घ्यावी. ही काळाची गरज आहे. यात लाज बाळगण्यासारख काही नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे भर रस्त्यात मुलींना मारणाऱ्या या नराधमांना गुन्हा सिद्ध होताच भर चौकातून, सर्व नागरिकांसमोर मरेपर्यंत फाशी देण्यात यावी. यामुळे निश्चितच अशा प्रकारांना आळा बसेल. आणि कितीतरी निष्पाप रिंकू, अमृता, नीता पुरुषी विकृत मानसिकतेला बळी जाण्यापासून वाचतील.

पद्मा सुर्वे-भाटकर
८, आनंद टॉवर, आनंद पार्क, ठाणे (प.)
दूरध्वनी : ५४३ ३५ ८१

• • •

---

आपल्या मुलासाठी खस्ता न खाणारी बाई आईपणाला वंचित रहाते.

# ' व्हिजन २०००'

**दीपाली सुरते**

*(विद्यार्थ्यांना संधी दिली व विश्वास दिला तर ते अनेक मोठमोठे कार्यक्रम आत्मविश्वासाने पार पाडतात. विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथप्रदर्शनाचं ऋण या दृष्टीने या लेखात व्यक्त झाले आहे.- संपादक)*

ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयातील ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना माहितीच्या आकाशगंगेत मुक्त सफर करण्याची सुर्वण संधी उपलब्ध करुन दिली. दिनांक १३-१४ जानेवारी २००० या दोन दिवसांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना ग्रंथपालाच्या जबाबदाऱ्या समजाव्या, त्यांना त्याच्या कार्यात कशा प्रकारे अडचणी येतात, ग्रंथपाल त्या कशा कुशलतेने पार पाडतात. या साऱ्याची प्रत्यक्ष कल्पना आणि विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव यावा हा त्या मागचा हेतू होता. हा कार्यक्रम करण्याचा मोलाचा विचार हा प्रा. मोहन पाठक यांनी सुचविला आणि त्यानुसार त्या अनुषंगाने त्यांनी काही समित्या ठरवून कामाची वाटणी करुन आपले विज्ञान शाखेचे वाचनालय दोन दिवस बंद ठेवून आम्हाला प्रदर्शनास ग्रंथालयाची जागा उपलब्ध करुन दिली. या साठी महाविद्यालय याचे प्राचार्य सी.जी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य आम्हाला लाभले. ग्रंथालय कर्मचारी वर्गाचे खूप मोठे सहकार्य लाभले. आमच्याकडे म्हणजेच विद्यार्थ्यांवर जबाबदारी सोपविली त्यासाठी त्यांनी सुरुवातीलाच समित्या निवडल्या असल्यामुळे कामाची व्यवस्थितरित्या आखणी, विभागणी झाली होती. यासाठी कोणते ग्रंथ निवडायचे ? वाचकाला कोणते ग्रंथ जास्त उपयोगी पडतील ? त्यांची आवड हे सर्व लक्षात घेऊन पुस्तक निवडली होती. तसेच ग्रंथालयात जेव्हा प्रदर्शन घ्यायचे तेव्हा कोणाकोणास निमंत्रण द्यायचे ? प्रमुख पाहुणे म्हणून कोणला बोलवायचे? उद्घाटनासाठी तयारी कशी करायची ? तसेच प्रदर्शनाची जाहिरात करणे. ग्रंथ मांडणी, ग्रंथालयाची सजावट असे अनेक प्रकारे विविध प्रश्न आम्हास पडले. कारण यासर्व गोष्टी आम्हां विद्यार्थ्यांना प्रथमच कराव्या लागणार होत्या. पण सर्वांनी त्या अगदी व्यवस्थित व सुसुत्रबद्धरित्या पार पाडल्या.

ठरल्याप्रमाणे १३ जानेवारी २००० रोजी सकाळी ९.०० वाजता सनई वादनाच्या मंगल स्वरात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे मुंबई विभागीय संचालक प्रा. चंद्रकांत भोंजाळ यांच्या हस्ते उद्घाटनाचा सोहळा पार पाडला. सदर कार्यक्रमास विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय श्री. टिल्लू सर, केंद्र प्रमुख प्राचार्य सी.जी. पाटील, प्रा. नारायण बारसे, प्रा. महेश दळवी आदी मान्यवर आवर्जून उपस्थित होते. ग्रंथालय सुंदर सजलेलेल होते. ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार झाडे ठेवली होते. शोभिवंत अशा रांगोळ्या काढल्या होत्या. ग्रंथालयाच्या मध्यावर दर्शनी अशी विद्येची देवता सरस्वती विराजमान होती. धूपाचा सुंगध सर्वत्र दरवळत होता. ठिकठिकाणी पताका लावल्या होत्या.

प्रदर्शनात सुमारे ६०० संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आले होते, विश्वकोश, संस्कृतिकोश, चरित्रकोश हे वाचकांचे लक्ष वेधून घेणारे होते. प्रदर्शन पहणारे बहुसंख्य विद्यार्थी हे विज्ञान शाखेचे होते. तेव्हा विज्ञान विषयावरील संदर्भ ग्रंथांना न विसरता प्रदर्शनात जास्त स्थान होते. प्रतिष्ठित व्यक्ती व इतरांची उपस्थिती ही जणू आमच्या कार्यांच्या

सफलतेची पावतीच होती. विशेष म्हणजे विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर, उपाध्यक्ष करंदीकर व कार्याध्यक्ष टिळू सर व कार्यवाह उत्तम जोशी यांनी स्वतः वेळ काढून प्रदर्शन पाहिले. आमचे कौतुक केले. यामुळे आमचे प्रयत्न सार्थकी लागल्याचे समाधान मिळाले.

या साऱ्या प्रदर्शनातून आम्ही खूप काही शिकलो. जे कदाचित व्यवहारिक जगात शिकू शकणार नाही. कारण ग्रंथ आणि ग्रंथालय यांचा संबंध आमच्या शालेय जीवनात नाम मात्र होता. आम्ही ग्रंथालयाकडे एक विलक्षण किचकट आणि डोकेदुखी व जागा या अर्थानेच पाहत आलो. एखाद्याने ग्रंथालयातून पुस्तक आणलं की तो शाळेतला अभ्यासू विद्यार्थी अशाच अनेक समजूती आमच्या होत्या. आज पर्यंत आम्ही नाण्याची एकच बाजू पाहिली व त्यावरच आमची मते प्रदर्शित केली. पण आज जेव्हा आम्ही आमचे ग्रंथ प्रदर्शन वाचकांसमोर, वाचकांसाठी सादर केले त्या दृष्टिकोनातून आम्ही फार बदललो आहोत.

आज आम्हाला ग्रंथालय ही एक फुलांची फुललेली बाग वाटते. त्यातील प्रत्येक पुस्तक आमचं एक फूल असत. आणि ते फूल वेगवेगळ्या रंगात , शब्दात, आकारात फुललेलं असत. ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा आम्हांला त्याच फुल बागेचा माळी वाटतो. याच धरतीवर आम्ही नाण्यांची दुसरीबाजू उलगडून पाहत आहोत. आज आनंदाची गोष्ट हीच की, आम्ही सर्व इतरांपेक्षा निराळे आहोत. आमंच कार्य आणि आमच्या कार्यांची व्याप्ती याचा पसारा अफाट आहे. आमच्या क्षेत्रात सर्व क्षेत्रे एकवटतात. आज ग्रंथालयाची परिभाषा काळाप्रमाणे बदलत गेलेली आहे. पूर्वीचे ग्रंथालय आणि ग्रंथांचा ग्रंथपाल ही संज्ञा आता फार जुनाट वाटते. आताचे युग हे पेपरलेस लायब्ररीचे आहे. माहिती युगाचा खराखुरा शिल्पकार हा ग्रंथपालच ठरावा. याचा विश्वास आम्ही आज संपादन करीत आहोत. आणि म्हणून या क्षेत्रातील अधिकाधिक ज्ञान अवगत व्हावे याचा आम्ही प्रयत्न करु.

प्रदर्शनाची सुरुवात ते पार पाडण्यापर्यंतचे कार्य हे सर्व आम्ही प्रथमच अनुभवलं. त्यातून आम्हाला ज्या काही गोष्टी शिकायला मिळाल्या हेच अनुभवाचे गाठोडे जवळ ठेवून आम्ही पुढील माहितीच्या क्षेत्रात पाऊल टाकणार आहोत.

यासाठी आम्ही मनोमन आभार मानतो ते म्हणजे आमच्या प्रा. पाठक सरांचे तसेच विज्ञान शाखेतील विद्यार्थी ज्यांनी उत्फूर्तपणे आम्हाला प्रतिसाद दिला. ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग ज्यांनी वेळोवेळी कामात आम्हाला मदत केली प्रोत्साहन दिले आणि प्रदर्शनास आलेल्या सर्व मान्यवरांचा.

**दीपाली सुरते**
ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी, अभ्यासक्रम,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

• • •

*With Best Compliments From*

A
Well
Wisher

# बातचीत : बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी

श्री. अरुण ठाकूर व कु.दीपाली भाटकर

*( बाबासाहेब पुरंदरे यांची मुलाखत 'दिशा' त यावी असे बरेच दिवस मनात होते. आमचे निकटचे स्नेही व हितचिंतक श्री. अरुण ठाकूर यांना दिशाच्या वतीने आपण हे करावे अशी आम्ही विनंती केली. ही मुलाखत मिळवण्याचे श्रेय त्यांना आहे. त्यांनी बाबासाहेबांच्या आवाजातील ध्वनिफीत बनवून आणली व या ध्वनिफीतीचे शब्दशः शब्दांकन करून मुलाखत कागदावर उतरविण्याचे काम 'दिशा' च्या दीपाली भाटकर यांनी केले. बाबासाहेबांचे इतिहासाबद्दलचे हे चिंतन हा महत्त्वपूर्ण ठेवा या दोघांमुळे वाचकापर्यंत पोहचविणे शक्य झाले आहे. -संपादक)*

**श्री. ठाकूर** : आजच्या तरुण पिढीला एकूणच इतिहासाचे भान कमी आहे. या बद्दल आपले मत काय ?

**बाबासाहेब** : इतिहासाचे भान हे या देशाला पूर्वी पासूनच नाही. इतिहास हे एक मौलिक धन आहे. याचा सुगावा अजूनही या देशाला लागलेला नाही. आणि त्यामुळे इतिहास म्हणजे भाकडकथा, इतिहास म्हणजे कालबाह्य गोष्टी एवढेच फक्त आपण डोळ्यापुढे ठेवतो. तसे असता कामा नये, इतिहासातून प्रेरणा घ्यायची असते , इतिहासातून मार्गदर्शन घ्यायचे असते. साधन नेहमीच बदलत असतात. साध्य हे कायम असते. शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना रामाच्या, मारुतीच्या लंकेवरच्या हल्ल्याच्या लंकादहनाच्या, कंस वधाच्या गोष्टी सांगितल्या. याचा अर्थ असा नव्हता की तोरणा किल्ल्यावरती हल्ला करताना सगळ्यांनी धनुष्यबाण घेऊन हल्ला करावा. तसं अजिबात नव्हतं.

त्याच्यातून फक्त तत्त्वज्ञान घ्यायचं, तशी प्रेरणा घ्यायची आणि लोकमान्य टिळकांनी ही सांगितले की शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा आणि त्यांची जयंती साजरी करा. म्हणजे त्यांच्या सारखेच करा असे नाही. त्याचा अर्थ असाही नव्हता की केसरीबीसरीतल्या सगळ्या कंपोझीटर्सनी उद्या तलवार घेऊन किल्ल्यावरती हल्ला करायचा. त्यातील सत्त्व घ्यायच असतं. इतिहासाचं सत्व हे फार महत्वाचं आहे. आज अजूनही ते भान आपल्याला नाही आणि ते नाही याचे परिणाम पावला पावलावर आज दर दिवशी बघतो आहोत.

**श्री. ठाकूर** : शिवकालीन स्थळांची दुर्दशा मोठ्या प्रमाणावर झाली आहे. एक इतिहास संशोधक या नात्याने ही दुर्दशा थांबविण्यासाठी काही उपाय सुचवाल का ?

**बाबासाहेब** : पहिली गोष्ट म्हणजे शहरातून किल्ल्यावरती किल्ला पहायला म्हणून जाणाऱ्या लोकांनी किल्ल्यावरचे वातावरण बिघडून टाकणारे व्यसनबाजीचे जे थैमान चालते ते बंद करावे. रायगडावर जायचे आणि दारू प्यायची ही कुठली सहल ? हा कुठला आनंद ? तुम्हाला दारू पिऊन लोळायला पुण्या-मुंबईतील गटारं काय कमी आहेत ? रायगडच कशाला हवा? पण त्याबाबतीतही आम्ही या ऐतिहासिक स्थळांच दुरुपयोग करतो. दुसरी गोष्ट किल्ल्यावरती आज जे अस्तित्वात आहे ते आम्ही आमची ताकद लावून ढकलून पाडतो. ते किल्ल्याच्या तटावरचे दगड खूप ताकद लावायची ते ढिले करायचे आणि मग किल्ल्यावरून ढकलून खाली कसे कोसळत जातात एवढी एक क्षणाची गंमत पहायची. पुन्हा कोणी ते बांधायला मात्र येणार नाहीत. खरं तर हे एक मौलिक धन आहे. म्हणून... असे होता कामा नये. आज जर आपण युरोपात गेलो तर तेथे त्या लोकांनी ६०० -७०० वर्षांपूर्वीच्या गोष्टी सुद्धा आणि अगदी नजिकच्या इतिहासातील सुद्धा अनंत गोष्टी अत्यंत अभिमान पूर्वक जपून ठेवल्या आहेत. म्हणूनच ते

महायुद्ध जिंकू शकतात, त्या जपून ठेवल्या आहेत म्हणूनच पहिल्या एलिझाबेथच्या वेळेला स्पॅनिश आरमार आले होते. त्या वेळेस त्या आरमाराचा आम्ही कसा पराभव केला याची प्रेरणा ही यंगर प्रिन्सच्या वेळेला आम्हाला दिसून येते. त्यांच्या इतिहासात दिसते आणि ती प्रेरणा पुढे कैसरच्या वेळेलाही दिसून येते. शत्रू हा इंग्लिश भूमीवर उतरू शकत नाही याची काही वैज्ञानिक कारणे असतील तर त्याच्या जोडीला हे महत्त्वाचे कारण आहे ते तेथील अत्यंत स्वाभिमानी आणि कठोर देशभक्त स्वतःच्या इतिहासावरती नितांत प्रेम करणारे परंतु डोळस प्रेम करणारे असे आहेत. इतिहासावर प्रेम करायच तर ते चाणक्या सारखे, भगवान श्रीकृष्णा सारखे, टिळकांसारखे, सुभाषचंद्र बोसा सारखे, वीर सावरकरांसारखे करायचे आहे.

**श्री. ठाकूर** : शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आणि मराठी माणसांचे आराध्य दैवत. इतर अनेक गोष्टीं प्रमाणे महाराजांच्या आठवणी , महाराजांचे नाव या सर्व गोष्टींचा बाजार व अवमल्यून केले जात आहे. या सर्वांसाठी काय करता येईल ?

**बाबासाहेब** : ज्यांनी रामाच्या नावाने आम्हाला रामराज्य निर्माण करायचे आहे म्हणून टाहो फोडला आणि ५० वर्षे आम्हाला फसवले त्याचा कधी विचार केला का ? रामाच्या नावाचा गैरउपयोग त्यांनीही केला. कोणीच कोणाच्या नावाचा गैर उपयोग करू नये. परंतु कोणावर नेमकं बोट ठेवून त्यांना दोषही देऊ नये. प्रेरणा घ्यायची उदाहरणे सर्वत्रच असतात. तीच प्रेरणा उद्या वर्तमान काळा मधील उत्तुंग हिमालयाची शिखरे चढून जाणाऱ्या शेर्पा तेनसिंगची ही प्रेरणा घेता येईल. असे काही नाही की शिवाजी महाराजांचच उदाहरण घेतले पाहिजे. आजही आपल्यामधे खेड्यापाड्यातून काम करणारी मंडळी दिसतात की जी जीवाचं रान करता आहेत स्वतःच्या संसाराची चिंता करत नाहीत. स्वतःकडचे पैसे खर्च करतात आणि लोकांच्या भल्याकरिता कामे करतात. त्यातून प्रेरणा घ्या. शिवाजी महाराजांच्या नावाचा गैरवापर होतो अस जर तुम्हाला वाटत असेल तर त्याबद्दल तक्रार करत बसण्यापेक्षा तुम्ही नवे आदर्श निर्माण का नाही करत? ते निर्माण करा. जे शिवाजी महाराजांच्या नावाचा गैरउपयोग करत आहेत त्यांचे मी समर्थन करत नाही. परंतु केवळ तक्रारी करत बसणे याने हा प्रश्न सुटत नाही. आपल्याला आपले मार्ग स्वतःच शोधले पाहिजेत. कामाला लागले पाहिजे. अब्राहम लिंकनचेच उदाहरण आजही अमेरिकेतील लोक घेतात. आम्हीही घेतो. जर वॉशिंग्टन शहरात गेलो तर आपल्याला १०० संस्था १०० गोष्टी अशा सापडतील की त्या आजही जॉर्ज वॉशिंग्टनच्या नावाने आज तिथे प्रचलित आहेत. त्याच्या बद्दल नाही कोणी तक्रार केली की यात वॉशिंग्टनच्या नावाच उपयोग करतायत. वॉशिंग्टनच्या सगळ्याच गोष्टींचे यश आजच्या अमेरिकेला मिळाले आहे का ? नाही मिळालं. उलट वॉशिंग्टन नंतर यादवी युद्ध झालेच. चुका या नेहमीच होत असतात. कोणत्याही चुकांचे समर्थन मी करत नाही. फक्त त्या चुकांची सारखी कोळश्यासारखी उगाळणी चालते. त्याबाबत आता माझी तक्रार आहे की कोळसा उगाळत बसू नका. इतिहासात चंदन ही खूप आहे आणि कोळसा ही खूप आहे. काय उगळायचे ते आपण ठरावयचं, काय उपयुक्त आहे ते पण आपण ठरवायचं. काही लोक आपण चंदनच उगाळू या कोळसा नको असे म्हणतात पण काही लोक चंदनाचा कोळसाकरून उगाळण्याचा जो उपयोग करतात ते लोक या अशा तऱ्हेच्या तक्रारी करत असतात की शिवाजी महाराजांच्या नावाचा गैरउपयोग चाललाय. पण हे लोक स्वतः रामाच्या नावाचा तेवढाच गैरउपयोग करतात. आणि त्यांनी गांधीजींच्या ही नावाचा गेली ५० वर्षे तेवढाच गैरउपयोग केला. हे मात्र अगदी अल्गद विसरून जातात.

**श्री. ठाकूर** : आपल्याला जीवन गौरव पुरस्कार मिळाला, पुण्यभूषण पुरस्कारही मिळाला. त्या बद्दलच्या आपल्या भावना सांगाल का ?

**बाबासाहेब** : ठीक आहे, हा वाटेवरचा एक टप्पा आहे. मी तिथे रेंगाळत नाही. अशा तऱ्हेचे आपल्याला जर समजा, काही मिळाल तर त्याचा चांगला उपयोग काय करता येईल, त्याचा फक्त मी विचार करतोय. पण... बरं

वाटलं आनंदही नक्कीच झाला. तो आनंद झाला नाही असं म्हणणं खोटं ठरेलं. खूप आनंद झाल बरं वाटलं. आणि मला हे ही पण माहित आहे की हा पुरस्कार ५ वर्षाआधी मला द्यायचं ठरलं होत. तेव्हा माझं नाव होतं हे ही पण माझ्या कानावरती आलं होतं. तेव्हा माझं नाव होतं पण त्याला विरोध झाला, हेही पण मला समजलेलं आहे. पण त्यानंतर तो मला इतक्या उशिरा मिळाला. म्हणून त्याची काही खंत मनात निर्माण झाली नाही. पुढे ज्यांना तो दिला गेला. त्यांचा जो योग्य वेळी आदर केला गेला त्यांचे वयोमान लक्षात घेऊन त्यांना तो दिला गेला त्याचे मला मनापासून समाधान आहे. हा जो पुरस्कार मला मिळाला आहे हा केवळ माझ्या एकट्याचा आहे असं मला वाटत नाही. खरंच वाटत नाही मी हे औपचारिक बोलत नाही. अनेकांनी केलेले कष्ट, अनेकांनी मला दिलेली मदत त्याचं हे फळ आहे. पण मी मला पुरस्कार देणाऱ्यांशी जेवढा कृतज्ञ आहे नं, तेवढा मला सहकार्य करणाऱ्या प्रत्येक मित्राशी, प्रत्येक सहकाऱ्याशी, प्रत्येक भगिनीशी मी अत्यंत कृतज्ञ आहे. मला गर्व वाटत नाही मला आनंद वाटतो. मला समाधान वाटते की मला हा पुरस्कार मिळाला.

**श्री. ठाकूर :** पूर्वी आपण एकदा प्रयत्न केला होता की 'शिवसृष्टी' हा राष्ट्रीय प्रकल्प व्हावा. त्यासाठी शासनाकडून पुढे काय प्रतिसाद मिळाला.


**बाबासाहेब :** शासनाने आपल्याला एक जागा द्याचं कबूल केल आहे. ती अद्याप मिळालेली नाही हे ही जरी खरे असले तरी ती मिळणारच नाही, असेही कोणी गृहीत धरू नये ती जागा मिळाली की आपल्या कामाला सुरुवात होईलच पण ती जागा मिळे पर्यंत जेवढी जागा आपल्या हातात आहे. मग ती जागा विश्राम वाड्यातील असेल नाहीतर मग कुठली एखादी छोटीशी पुरंदरे वाड्यातील त्या ठिकाणी आपल्याला जे शक्य आहे ते आपण करायचे.

**श्री. अरुण ठाकूर**
अरुण दर्शन,कोपरी रोड, ठाणे ४०० ६०२.
**कु. दीपाली भाटकर**
वि.प्र.मं.व्यवस्थापन संस्था, महाविद्यालय परिसर, ठाणे.

•••

हार्दिक शुभेच्छा !

आपल्या विश्वासाची, प्रथम पसंतीची !



ठाणे जनता
सहकारी बँक लि
शेड्युल बँक

मुख्य कार्यालय :
सेवाधाम, डॉ. मुस रोड, लालबाग,
ठाणे-४०० ६०२.

e-mail : tjsb@bom5.vsnl.net.in
Website : http:/www.thanejanta.co.in

# योग्य कामाचा योग्य गौरव

**मुलाखत : कु. दिपाली भाटकर**

आपल्या बांदोडकर महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. उषा तांबे यांना दिल्लीच्या एका साहित्य संस्थेचा पुरस्कार मिळाला. म्हणून त्यांची भेट घ्यायचे ठरले.



सौ. उषा तांबे

प्रा. तांबे खरेतर इंग्रजी साहित्य विषय घेऊन M.A. झालेल्या. नागपूर विद्यापीठाच्या ६४ सालच्या त्या सुर्वणपदक विजेत्या आहेत. पुढे ८९ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठातून एम्.फिल. केले. मराठी साहित्याची त्यांना तेवढीच आवड. मराठी साहित्याच्याही त्या सखोल अभ्यासक आहेत. महाराष्ट्र टाईम्स मध्ये त्यांची अनेक पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध झाली आहेत. साप्ताहिक सकाळ मध्ये ९८ ते ९९ या वर्षात 'निराकारातून आकार' ही १२ लेखांची मालिकाही प्रसिद्ध झाली. यामधे इमारती, धरणे, पूल इ. च्या स्थापत्य कलेबाबत स्थापत्य अभियांत्रिकी विषयावर परंतु सर्वसामान्यांच्या माहितीसाठी आणि त्यांना कळेल अशा भाषेत हे लेख होते. या लेखांचे एकत्रित असे पुस्तक आता प्रकाशित होत आहे. शशी देशपांडे यांच्या काही कथांची त्यांनी केलेली भाषांतरेही प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या स्वतंत्र कथाही प्रसिद्ध आहेत. मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेच्या त्या कार्यकर्त्या आहेत. गेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सूत्र संचलन सौ. तांबे मॅडमनीच केले होते.

अशा प्रकारे साहित्य क्षेत्रात सतत कार्यरत अशा सौ. तांबे यांचे प्रथम मी 'दिशा' तर्फे अभिनंदन केले. आणि पुरस्काराबद्दल विचारले. त्यांनी सांगितले की 'कथा' ही दिल्लीतील एक साहित्य संस्था. भारतात अनेक भाषा आहेत आणि प्रत्येक भाषेचे स्वतःचे असे विपुल साहित्यही निर्माण होत असते. त्यामधे अनेक चांगल्या कथा लिहिल्या जातात. परंतु सर्वांनाच सर्व भाषा येत नसल्याने अनेक चांगल्या कथांच्या आस्वादाला रसिक वाचकाला मुकावे लागते. असे होऊ नये म्हणून विविध भाषांच्या प्रतिनिधींकडून त्या त्या भाषेतील ३ उत्कृष्ट कथांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करून मागवले जाते. नुसतेच भाषांतर नाही त्या कथांबद्दल विश्लेषण, ती कथा का चांगली वाटली, कथेची वैशिष्ट्ये, समीक्षण वगैरे सर्व त्या कथेच्या प्रतीबरोबर संस्थेकडे पाठवावे लागते. मग या सर्व भाषांतील कथांतून पुन्हा उत्कृष्ट कथा निवडल्या जातात.

या 'कथा' संस्थेतर्फे सौ. तांबे मॅडम यांना मराठी भाषे करिता नॉमिनेटिंग एडीटर म्हणून नेमले गेले. आणि मग मॅडमनी निवडलेल्या दोन कथा /कथा विश्लेषणांना ( १) जाळ-सरिता पत्की २) अठरावा उंट- मेघना पेठे ) 'कथा प्राईस व्हॉल्यूम'' चा पुरस्कार श्री. गिरीश कर्नाड यांच्या हस्ते मिळाला.

या कथांच्या निवडी बाबत सौ. तांबे म्हणाल्या की 'जाळ' ही सरिता पत्की यांची कथा 'मिळून साऱ्या जणी' या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. या कथेची त्यांना आवडलेली प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ही अगदी आताच्या काळातील कथा आहे. आणि अगदी थोडक्या शब्दात लेखिका आपल्याला बरेच काही सांगून जाते. दुसरी कथा 'अठरावा उंट' ही मेघना पेठे यांची 'हंस' दिवाळी अंक ९८मधील आहे. यातही जे मनोविश्लेषण लेखिकेने केले

आहे ते खूपच सांगले आहे. तसेच भाषा ही समकालीन आहे.

प्रा. सौ. तांबे यांनी या दोन कथांचे कथाबीज, त्यांचे स्वरूप, वैशिष्ठ्ये वगैरे थोडक्यात पण इतकं छान समजावून सांगितल की कथा मूळातून वाचाव्याशा वाटतात.

या पुरस्काराबद्दल आपल्या भावना काय असे विचारल्यावर त्या म्हणाल्या की, एकाच वेळेस दोन कथांना पुरस्कार मिळाला याबद्दल आनंद तर झालाच पण या संस्थे तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यशाळेत भारतातील विविध प्रातांतील लोकांकडून किंवा विविध भाषिक साहित्यिकांकडून जी वैचारिक, सांस्कृतिक देवाण घेवाण होते ती महत्त्वाची वाटली. त्या इतर प्रातांतील लोकांकडून महाराष्ट्रा बद्दलची मराठीभाषा, संस्कृती, साहित्य इ.ची स्तुती ऐकून आनंदही वाटला. तसेच आपल्यालाही इतर प्रांतातील साहित्य क्षेत्राची माहिती होते. आपल्या चुका, कमतरता लक्षात येतात आपला अहंकार कमी होतो. आपल्या कार्याकडे एका त्रयस्थाच्या नजरेने बघण्याचा दृष्टिकोन मिळतो. या गोष्टींचे जास्त महत्त्व मला वाटते.

गेल्या १७ डिसेंबरला सौ. तांबे यांनी इंग्रजीमधे भाषांतरित केलेल्या 'नेल्सन मंडेलांच्या देशात' या पुस्तकाचे उपराष्ट्रपती श्री. कृष्णकांत यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या प्रसंगी श्री. मधु दंडवते ही उपस्थित होते व त्यांनी या भाषांतराची खूप स्तुती केली. या पुस्तकाबद्दल सांगताना मॅडम म्हणाल्या, 'या भाषांतरित मूळ पुस्तकाचे (मंडेलांच्या देशात) लेखक श्री. विजय नाईक यांच्याकडे द. अफ्रिकेतील लोकांनी या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीची मागणी केली तेव्हा त्यांना कोणीतरी माझे नाव सुचविले व त्यांनी ही जबाबदारी माझ्यावर टाकली.'

हे भाषांतर करतांना आलेल्या काही अडचणी बाबत त्या म्हणाल्या की आफ्रिकन नावे फारच अपरिचित असतात. त्यांचा उच्चारही फार वेगळा होतो. तसेच भाषांतर म्हणजे फक्त शब्दशः भाषांतर करायचे नव्हते. त्यामुळे आफ्रिकेसंदर्भातील इतर पुस्तके ही वाचली. नकाशाचा ऐतिहासिक घटनांचाही अभ्यास केला. अनेक छोटे छोटे शब्द फार सोपे वाटतात. पण त्याचे योग्य शब्दात भाषांतर करण्यासाठी शब्दकोश विश्वकोषांची मदत घेतली व त्यासाठी सायन्स कॉलेजच्या ग्रंथालयाचाही फायदा झाला आणि तो नेहमीच होतो असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

बोलता बोलता हे भाषांतर करत असतांनाच्या आठवणी निघाल्या त्या सांगत होत्या, तेव्हा मी अमेरिकेत होते तेथे फिरत असताना तेथील चमक धमक, भव्य दिव्यता, तेथील श्रीमंती पाहून आल्यानंतर रात्री जेव्हा भाषांतर करताना मंडेला, गांधीजी यांचे कष्ट, त्यांचा त्याग वगैरेच्या गोष्टी वाचल्या जायच्या तेव्हा एकदम जमिनीवर आल्या सारखे वाटायचे. वाटायचे हेच आपले खरे जग, हेच खरे जीवन आहे . ते भव्य दिव्य चकमकीत स्वप्नील आयुष्य आपले वास्तव नाही, हेच आपले वास्तव जग आहे. आपले मूळ इथेच आहे आणि हे असे वाटायला लावणारा गांधीजी, मंडेला सारख्यांचा त्याग तर महत्त्वाचा पण लेखकांनी त्या त्यागाचे वर्णन करून वास्तवाचे भान आणले त्या लेखकाचे ऋण ही मानते.

प्रा. सौ. तांबेचे लेखन यापुढेही सुरूच आहे. सध्या त्यांचे हेमा देवरे यांच्या 'विश्व विदेश सेवेचे' या पुस्तकाच्या भाषांतराचे काम सुरू आहे. तसेच त्यांच्या आईच्या आठवणींवर आधारित असे पुस्तक काढण्याचाही त्यांचा मानस आहे. संदर्भातही लेखन कार्य सुरू आहे.

त्यांच्या या पुढच्या प्रकल्पांकरिता त्यांच्या लेखनकार्याकरिता त्यांना 'दिशा' तर्फे शुभेच्छा!

**कु. दीपाली भाटकर**

विद्या प्रसारक मंडळाचे व्यवस्थापन संस्था,
महाविद्यालय परिसर, ठाणे ४०० ६०१.

• • •

---

भाग्य नेहमी धैर्यवानालाच अनुकूल असते.

# छोट्यांच्या राज्यात

प्रतिनिधी

*(जुहु येथिल S.N.D.T. विद्यापीठाच्या ग्रंथालयाला आवर्जून भेट द्यावा असा छोट्या विद्यार्थ्यांचा हा विभाग. संपादक मंडळातील प्रतिनिधीने सदर ग्रंथालयास आवर्जून भेट दिली व त्याचा परिचय दिशाच्या वाचकांसाठी येथे त्या करून देत आहेत- संपादक)*

जुहुच्या S.N.D.T. विद्यापीठात एक वेगळ्या प्रकारचे बाल वाचनालय आहे असे कळले म्हणून मुद्दामच जायचे ठरवले आणि खरोखरच एका रंगबिरंगी अशा छोट्यांच्या राज्यात प्रवेश केल्या सारखे वाटते.

दारातच लहान, निरागस मुलांची मोठीमोठी चित्रे आपले स्वागत करतात आणि आतील मोठी खोलीही प्राणी, फुले, वेगवेगळी कार्टुनस् अशा भरपूर चित्रांनी भरलेली आहे. खोलीतील वाचनासाठीच्या टेबल, खुर्च्या, लँपशेड ही अगदी छोट्या छोट्या रंगीत संगीत फुलांच्या आकाराच्या आहेत. पुस्तकाच्या मांडण्याही अगदी छोट्या छोट्या. कारण छोट्यांचा हात पुस्तकांपर्यंत सहज पोहोचला पाहिजे ना ! आणि गंमत म्हणजे इथे छोट्या छोट्या गाद्या देखिल आहेत यावर मुले मनसोक्त उड्या मारतात, नाचतात आणि झोपून /लोळून वाचतात देखील.

साधारण ३-१५ वयोगटासाठी हे वाचनालय आहे. पुन्हा गट पाडून ३-५ वर्षांसाठी वेगळी पुस्तके, ५-७, ७-१० अशा वेगवेगळ्या गटासाठी वेगवेगळ्या मांडण्या ठेवल्या आहेत. तर त्यातही एका कप्प्यामध्ये फक्त परिकथा, दुसऱ्या कप्प्यामध्ये फक्त रहस्य कथा किंवा धाडसी कथा-तर तिसऱ्या कप्प्यामध्ये विविध देश आणि लोक यांची माहितीपर पुस्तके, चौथ्या कप्प्यामध्ये फक्त खेळ विषयक पुस्तके पुढच्या कप्प्यात विज्ञान कथा तर नंतरच्या कप्प्यात इंग्रजी भाषा विषयक पुस्तके अशी फार रंजक प्रकारे मांडणी केली आहे.

या वाचनालयात Children Britanica, World Bank, Child Craft या सारखी काही संदर्भ पुस्तके देखील आहेत. त्याच प्रमाणे मराठी, हिंदी, गुजराथी भाषेतील गोष्टींच्या पुस्तकांसाठी देखिल वेगवेगळ्या मांडण्या आहेत. फक्त या वाचनालयात गोष्टीची पुस्तकेच नाहीत तर काही प्रसिद्ध कॉमिक्स् देखिल बाईंडिंग करून ठेवली आहेत. लहान मुलांसाठी खास अशी वर्तमानपत्रे देखील येतात.

सर्वात मजेदार म्हणजे येथे मुलांना त्यांच्या मनाप्रमाणे वागू देतात; जर मुलांना वाचायचा कंटाळा आला तर त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे कोड्यांचे खेळ (Puzzle games) खेळायला दिले जातात किंवा तेथील फळ्यावर काहीही चित्रे वगैरे काढायला परवानगी असते. तसेच आठवड्यातून एका दिवशी गाणी किंवा गोष्टींच्या कॅसेट्स मुलांना ऐकविल्या जातात.

रोजच्या अशा मजेदार अनुभवांबरोबरच 'मे महिन्याची सुट्टी', 'दिवाळीची सुट्टी' अशा सुट्टीच्या दिवसात वाचनालयात मुलांसाठी वेगवेगळ्या कार्यशाळा किंवा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जसे हस्तकला, चित्रकला, नाटके, वेषभूषा वगैरे. या कार्यशाळा म्हणजे सलग काही दिवसांचा कार्यक्रम असतो. यामधे आधी मुलांना नवीन नवीन गोष्टी शिकविल्या जातात. मग त्यांच्या कडून त्यांचा सराव करून घेतला जातो. किंवा त्या करवून घेतल्या जातात व नंतर त्या विषयाची स्पर्धा /परीक्षा ठेवली

(पान क्रमांक २७ वर)

---

वृक्ष ही परमेश्वराने पृथ्वीवर केलेली स्वाक्षरी आहे.

# आठवणींचे पक्षी-

## बालपणाच्या दाहक आठवणी

मानसी

*( आठवणींचे पक्षी ! दाहक अनुभव घेतलेल्या प्र.ई. सोनकांबळे यांच्या पुस्तकाची ही ओझरती ओळख. ही वाचून मूळ पुस्तक वाचावेसे वाटल्यावाचून राहणार नाही. - संपादक)*

बालदोस्तानो, आयुष्यात हवं ते हवं तेव्हा न मिळणं व त्यातून निर्माण होणाऱ्या हाल अपेष्टांना सामोरं जात आयुष्यात काही तरी करून दाखवणं, किती कठीण असतं याची कल्पना आली तर जीवनाची वेगळी जाणीव होऊ शकते. वास्तव किती दाहक असू शकते याची कल्पना असे जीवन जगलेल्या अनेकांच्या चरित्र आत्मचरित्रावरून येऊ शकते. अशी चरित्रे वाचली तर दुःखाप्रती पाहण्याचा, दुसऱ्यांचे दुःख जाणून घेण्याचा एक व्यापक दृष्टिकोन आपल्यात निर्माण होऊ शकतो.

'आठवणींचे पक्षी' हे आत्मचरित्र आपल्यात अशी संवेदनक्षमता निर्माण करून आपल्यातील जीवनाची जाणीव वाढविणारे आहे. या पुस्तकाचे लेखक आहेत प्रा. प्र.ई. सोनकांबळे. त्यांच्या बालपणातील आठवणी वाचल्या अन् मन सुन्न झाले. दलित वर्गात, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जन्म झालेले सोनकांबळे. हाल अपेष्टा सोसत, कष्ट करीत, विद्याभ्यास पूर्ण करण्याचा ध्यास त्यांनी सोडला नाही.

प्रा. सोनकांबळे यांचे नाव प्रल्हाद. पण बालपणी क्वचितच त्यांना कोणी खऱ्या नावाने हाक मारले असेल. कधी परलू, कधी परल्या तर कधी पऱ्या अशा नावाने लोक त्यांना संबोधित. आईवडिलांचे छत्र लहानपणीच गमावलेले. त्यामुळे अक्का म्हणजे मोठ्या बहिणीच्या घरातच प्रल्हाद वाढला. गरिबीचे चटके माणसाला खूप काही शिकवतात. त्याची जाण वाढते. प्रल्हादला आपल्या परिस्थितीची त्या लहान वयातच जाणीव झाली. त्यातून बहिणीला आपला भार नको यासाठी तिच्या घरातील काम तो करू लागला. एकीकडे शिक्षणही चालू होतचं.

गावात जनावर मेलं की मांसाचा वाटा मिळण्याच्या आशेने त्या जनावराचे लचके तोडायला लोक धावत. हमरीतुमरी वर येऊन भांडत. भूक माणसाला किती अगतिक करते त्याचं दर्शन प्रल्हादला लहान वयातच झालं. या प्रसंगाचे वर्णन सोनकांबळे करतात तेव्हा करुणेनं मन भरून येतं, प्रसंग डोळ्यासमोर येतो. या गर्दीत प्रल्हादला मिसळावं लागायचं. भांडून मांसाचा वाटा, पदरी पाडून घ्यावा लागायचा. प्रल्हाद स्वतः तर मांस खायचा नाही. पण बहिणीच्या पोरांना ते मिळावं, यासाठी धडपडावं लागायचं.

प्रल्हाद मांस खायचा नाही, कारण लहानपणी वारकरी संप्रदायाची माळ त्याच्या आईने त्याच्या गळ्यात घातली, तेव्हा त्यान तिला वचन दिलं होत. शिळीपाकी भाकरी चपळायची. तेही नशिबी नसेल तर पाणी प्यायचं व समाधान मानायचं.

हे वर्णन वाचताना प्रल्हाद सोनकांबळेंच्या जीवनातील ते कठीण दिवस डोळ्यासमोर उभे राहतात. आयुष्य जगण्यासाठी प्रल्हादला त्या वयात काय काय करावं लागलं.... किती हालअपेष्टा सोसाव्या लागल्या! गावात मेलेल्या जनावरांची प्रेत गावाबाहेर नेऊन टाक, त्या जनावरांची हाडं वीक, आंघोळ करायला मिळेलच असे ते दिवस नव्हते. मग गुरे राखण्यासाठी गावातून दूर गेले की राखण करता करता एखाद्या डबक्यात आंघोळ आटप, बहिणीच्या घरातही दारिद्र्य. खायला मिळेल याचा भरवसा

नाही. मग या साठी पऱ्या चार दारं फिरून भीक मिळवायचा.

शहरात, चांगल्या शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या जगाची कल्पनाही येणार नाही. 'आठवणींचे पक्षी' मधील आठवणी इतक्या दाहक आहेत, वेगळ्या आहेत. प्रल्हादला कुत्रं चावलं तो प्रसंग पहा, हृदयद्रावक अशी ती आठवण वाचून दगडालाही पाझर फुटेल. कुत्र्यांच्या तोंडातला घास मिळण्यासाठी परल्या धडपडत 'हाड हाड' करीत कुत्र्याच्या मागे लागला. कुत्रा गुरगुरत होता, पण तोंडातलं सोडत नव्हता. प्रल्हाद त्याच्या जवळ गेला. कुत्र्याच्या तोंडातला घास मिळेल या आशेने. एवढ्यात कुत्रा चवताळला व प्रल्हादच्या पायाला तीन चारदा चावला. रक्तबंबाळ झालेला प्रल्हाद, भुकेने कासावीस होऊन आगतिक झाला!

शाळेतले गुरुजी मात्र चांगले होते. प्रल्हादची रोजनिशी वाचून त्यांना वाईट वाटे, ते कधी मधी प्रल्हादला घरी नेऊन खाऊ घालीत. अशा हालअपेष्टा सहन करीत प्रल्हाद शिकत राहिला. मॅट्रिक झाला. पुढच्या शिक्षणासाठी त्यानं गाव सोडलं तो प्रसंगही असाच हृदय विदीर्ण करणारा.

सोनकांबळे यांनी मोकळेपणाने सारं कांही मांडले आहे. आठवणीतील नितळपणा, चित्रदर्शी शैली यामुळे हे पुस्तक एकदा घेतलतं की तुम्ही शेवटपर्यंत खाली ठेवणार नाही. मात्र हे पुस्तक म्हणजे एका दलित माणसाचा भूतकाळ आहे, एकाच माणसाच्या नशिबाचे भोग आहेत असं नाही. प्रा. सोनकांबळे यांचा या आठवणी प्रतिनिधिक आहेत. म्हणूनच वास्तवाची जाण आपल्यात निर्माण व्हावी, समाजाचे जीवनाचे खरे रूप कळावे, दुःखितांबद्दल संवेदना क्षमता यावी, यासाठी हे पुस्तक वाचायला हवं. प्रां सोनकांबळे यांच्या जिद्दीचा, शिक्षणासाठी वाटेल ते भोगण्याचा आदर्श बाळगायला हवा.

मानसी
कळवा, ठाणे.

• • •

**छोट्यांच्या राज्यात**

(पान क्रमांक २५वरून)

आते. यानंतर बक्षिस समारंभ व (पार्टी) ने कार्यशाळेचासमारोप होतो. अशा कार्यशाळांमधे देखिल मुले उत्साहाने भाग घेतात.

लहान मुलांच्या दृष्टीने Wonderland ठरावे अशा या वाचनालयात पृथ्वीचा गोल, विविध नकाशे अशा अभ्यासाच्या गोष्टी देखील आहेत.

अशा या छोट्यांच्या राज्यांचे तिकीट म्हणजे या वाचनालयाची वार्षिक वर्गणी फक्त रु. १२०/- आणि डिपॉझीट रु. ५०/- भरून कोणाही छोट्याला सभासदत्व मिळू शकते व १५ दिवसासाठी दोन पुस्तके घरी दिली जातात.

लहान मुलांना लहानपणा पासूनच आणि त्यांच्या कलाने, मर्जीनुसार किंवा मनापासून वाचनाची आवड निर्माण व्हावी, पुस्तकांशी त्यांचा संपर्क यावा, यासाठी कार्यरत असलेले हे वाचनालय हा एक खरोखरच स्तुत्य आणि योग्य असा प्रयत्न म्हणता येईल. लहान मुलांच्या मानसिकतेचा व त्यांच्या आवडीनिवडीचा विचार करून साकार झालेले हे परिपूर्ण असे हे वाचनालय १९८४ पासून येथे सुरू आहे. खरेतर प्रत्येक शहरात असे वाचनालय असणे आज आवश्यक आहे. केवळ टीव्ही, व्हीडिओ मुळे आजची मुले वाचत नाहीत त्यांना मुळी वाचनाची आवड नाही असे म्हणत बसण्यापेक्षा जर ठिकठिकाणी अशी वाचनालये निर्माण झाली तर अधिकाधिक छोट्यांना या चा Wonderland अनुभव घेता येईल आणि वाचन संस्कार पुन्हा मूळ धरू लागेल.

प्रतिनिधी ''दिशा''

• • •

---

ग्रंथाच्या इतके उंची फर्निचर दुसरे कोणतेच नसते.

# महाराष्ट्राचा इतिहास

## स्थापनादिन - १ मे १९६०

| | |
|---|---|
| राज्याची राजधानी | : मुंबई |
| उपराजधानी | : नागपूर |
| अक्षांश | : १५° ८' उत्तर २२° १' उत्तर |
| रेखांश | : ७२° ६' पूर्व ते ८०° ९' पूव |
| चतु:सीमा | : पूर्व-मध्य प्रदेश पश्चिम-अरबी समुद्र, दक्षिण-गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, उत्तर-दादरा नगर हवेली, गुजरात व मध्य प्रदेश |
| क्षेत्रफळ | : ३,०७,७१३ चौ. कि. मी. |
| लोकसंख्या | : ७,८९,३७,१८७ |
| लोकसंख्येची घनता | : २६५ |
| लोकसंख्या वाढीचे प्रमाण | : २४.७३% |
| दरडोई उत्पन्न | : ६१८४ |
| पूर्व-पश्चिम लांबी | : ८०० कि. मी. |
| दक्षिणोत्तर लांबी | : ७०० कि. मी. |
| समद्र किनारा | : ७२० कि. मी. |
| पर्वत रांगा | : सातपुडा, सह्याद्री (उपरांगा : सातमाळा, अजिंठा डोंगर, हरिश्चंद्र डोंगर, बालाघाट, महादेव डोंगर) |
| सर्वात उंच शिखर | : कळसूबाई - १,६४६ मीटर |
| महत्वाचे घाट | : कोकणात जाण्यासाठी सह्याद्रीवरील घाट : थळ, माळशेज, बोर, वरंधा, कुंभार्ली, आंबा, फोंडा व आंबोली घाट पुणे-सातारा : कात्रज, खांबाटकी पुणे-सासवड, दिवा घाट औरंगाबाद -चाळीसगाव : औट्रम |
| प्रमुख नद्या | : नर्मदा : तापी : (उपनद्या : पांझरा, गिरणा, मोर्णा, पूर्णा, काटेपूर्णा) |
| वैणगंगा | : (पेंच, कन्हान, वर्धा, पैनगंगा) |
| गोदावरी | : (सिंदफणा, मांजरा, पूर्णा, मन्माड, दुधना, प्रवरा) |
| भीमा | : (कुकडी, घोड, भामा, इंद्रायणी, मुळामुठा, पवना, कऱ्हा, नीरा, माण व सीना) कृष्णा : कोयना, वेण्णा, गायत्री, येरळा, वारणा, पंचगंगा, मलप्रभा व घटप्रभा) |
| कोकणातील नद्या | : (वैतरणा, तानसा, काळू, उल्हास, आंबा, सावित्री, वाशिष्टी, शुक, गड, शास्त्री व तेरेखोल) |
| प्रमुख धरणे | : नर्मदा-सरदार सरोवर पेंच-पेच प्रकल्प, गोदावरी - गंगापूर व जायकवाडी, भीमा-उजनी, पूर्णा- येलदरी व सिद्धेश्वर ,प्रवरा-भंडारदारा, नीरा-भाटघर व वीर कृष्णा-धोम, मांजरा-धनेगाव, तेरणा-ढोकी, मुठा-पानशेत व खडकवासला, कोयना-कोयना, पैनगंगा - इसापूर, गाढवी-इजटहाढोह |

(पान क्रमांक ४० वर)

# मार्च २०००

सौ. विशाखा देशपांडे

शैक्षणिक वर्षातील उपक्रमांच्या गर्दीचे दिवस आता ओसरत आले आहेत. परीक्षांचे वारे वाहू लागले आणि परिसरात शांत, अभ्यासू, गंभीर वातावरण पसरू लागलं. सर्वच जण आता हळूहळू परीक्षामय होऊन जातील. अभ्यासात गढून जातील. वर्षभर केलेल्या सर्वच कष्टांची परीक्षा आता द्यावी लागणार. त्याची फळं गोड आली तरच पुढच्या शैक्षणिक वर्षासाठी नवीन जोमाने सज्ज रहाण्यासाठी उर्मी निर्माण होईल. दहावी आणि बारावीच्या परीक्षा एव्हाना झाल्या असतील, पण आता ही सुट्टी मात्र विद्यार्थ्यांनी योग्य रीतीने , सत्कारणी लावावी.

या शैक्षणिक वर्षातील हे शेवटची 'परिसर वार्ता' सदर असले, आमच्या सर्व विद्यार्थ्यांना मी 'दिशा' तर्फे परीक्षेसाठी Best Luck देवून ही 'परिसर वार्ता' सादर करीत आहे.

बराय तर मंडळी ! पुन्हा भेटूया पुढच्या शैक्षणिक वर्षात, म्हणजे जुलैच्या अंकात. नमस्कार

**जाम्बोरी - २००० -चेन्नई (सौ. मनाली देवधर यांजकडून)**

दिनांक २४ जानेवारी २०००च्या दुपारी गाईडच्या १० विद्यार्थिनी, २ गाईड कॅप्टन, मनाली देवधर व प्रियांका भांगले व एक मदतनीस बाई अशी तुकडी, मुंबई-चेन्नई एक्सप्रेसने जाम्बोरी-२००० साठी रवाना झाले. प्रवासात नेहमीच येणाऱ्या काही जुजबी अडचणींना तोंड देत दिनांक २६ जानेवारी रोजी अखेर आपली तुकडी कॅंप साईटला पोहोचली.

राज्यातील इतर गाईड्स व स्काऊट यांनी महाराष्ट्राचे सुंदर गेट व गॅझेटस् तयार केले. आपली संस्कृती दाखवीणारी होतीं राजस्थान, गुजराथ, नागालॅंड, मध्यप्रदेश, तामिळनाडू , येथील छात्रांनी अतिशय सुंदर गॅझेट्स केली होती. जाम्बोरी २००० ची सुरवात, मार्च-पास्ट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि फुगे उडवून पारंपारिक पद्धतीने झाली. त्या नंतर लोकनृत्य, ॲडव्हेंचर गेम, इंटिग्रेशन गेम, इन्स्पेक्शन्, पायोनियरिंग, स्किलो-रामा, व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, शोभा यात्रा, प्रदर्शन, युथ-फोरम, समूहगान या सारख्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व जण संपूर्णपणे जांबोरीमय झाले होते.



जाम्बोरी -२००० -चेन्नई
सौ. ए.के.जोशी स्कूलच्या छात्रांची तुकडी

रात्रीच्या वेळेस एरियामध्ये चालणारा सांस्कृतिक कार्यक्रम बघणे म्हणजे पर्वणीच. कारण संपूर्ण भारताचं एकत्रित सांस्कृतिक दर्शनच इथे घडत होत. महाराष्ट्राने आपल्या पारंपारिक हळदी कुंकु समारंभ केला. रांगोळ्या घालून आपली संस्कृती दाखवणारे कार्यक्रम सादर केले. १ फेब्रुवारीला तामिळनाडूचे मुख्यमंत्री श्री. करूणानिधी हे सांगता समारोपाला हजर होते.

---

नेत्र म्हणजे आत्म्याच्या खिडक्याच असतात.

आपल्या शाळेतील आठ विद्यार्थिनींना जाम्बोरी ॲवॉर्ड मिळाला. दोन विद्यार्थिनींना व्हिलेज डेव्हलपमेंट साठी खास प्रशस्तिपत्रक मिळाले. मार्च-पास्ट व कलर पार्टी साठी सर्व मुली निवडल्या गेल्या व महाराष्ट्रास दोन्हीसाठी 'A' Grade मिळाली. आपला कँप फायर 'गांधी-गोडसे कँप फायर' साठी सिलेक्ट झाला.

या जाम्बोरी-२००० मधे भाग घेतलेल्या छात्रांची नावे - मानसी बापट, प्रियंका शिरसाट, रश्मी ठाकूर, अल्पना गुप्ते, अनघा फळ, गौरी देशमाने, स्वाती जाधव, मानसी सोहोनी, प्रिया मराठे व चार्मी निशार. गाईड कॅप्टन शिक्षिका होत्या मनाली देवधर व प्रियंका भांगले व मदतनीस बाई आशा शिगवण या होत्या.



सौ. ए.के.जोशी स्कूल - श्री. सुधीर जोशी-कला प्रदर्शनाची पाहणी करत असताना.

दि. २० फेब्रुवारी हा आपल्या मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांचा जन्मदिवस. या दिवसाचे औचित्य साधून, सौ. ए.के. जोशी स्कूल इंग्लीश मिडीयम शाळेमधे वार्षिक, हस्तकाला, चित्रकला, विज्ञान व पुस्तक प्रदर्शन भरवल जातं. त्या प्रमाणे या वर्षी सुद्धा हे प्रदर्शन शाळेमधे भरविण्यात आले होते. पूर्व-प्राथमिक ते इ. १०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे प्रदर्शन मांडले ते बघून खरोखरच असा विचार मनात आला की, ही पिढी एवढी सृजनशील आहे. यांना खरोखरच योग्य रीतिने मार्ग दर्शन केल्यास, आपला देश, सर्व राष्ट्रांमधे अग्रस्थानी पोहोचण्यास वेळ लागणार नाही. इयत्ता ५वी ते १०वीच्या मुलांनी जे विविध वैज्ञानिक प्रयोग मांडले होते.

या निमित्ताने राज्याचे माजी शिक्षण मंत्री श्री. सुधीर जोशी यांनी दिनांक २१ फेब्रुवारीला शाळेला भेट दिली. या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमांत, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी सर्वांचे स्वागत केले. पाहुण्यांची ओळख करून देताना त्या म्हणाल्या की अनेक दिवस, अनेक वर्षे श्री. सुधीर भाऊंनी शाळेला भेट द्यावी अशी आमची इच्छा होती. आणि आज तो योगायोग जुळून आला असल्यामुळे हा दुग्ध् शर्करा योग आहे, असे आम्ही मानतो.



सौ. ए.के.जोशी स्कूल - प्रथमिक विभाग प्रदर्शन

या प्रसंगी बोलताना श्री. सुधीर जोशी म्हणाले, की या शाळेबद्दल मी अनेक लोकांकडून चांगल्या गोष्टी ऐकत होतो, म्हणून प्रत्यक्षात ही शाळा कशी आहे हे जाणून घ्यायचं होत आणि इथे आल्यावर माझी खात्री पटली की जे ऐकलं ते बरोबरच होतं, ते म्हणाले की मी किंवा माझा

पक्ष हे वैयक्तिक रित्या इंग्रजीच्या विरुद्ध नाहीत, पण मातृभाषा व राष्ट्रभाषा यावर प्रत्येकाचे प्रेम असावेच असे आणि इकडंच मराठी वातावरण बघून माल फार आंनद झाला. इयत्ता पहिली पासून इंग्रजी शिक्षण सक्तींच करण्याबाबत ते म्हणाले की येवढ्या लहान वयात मातृभाषा, राष्ट्रभाषा, मुल शिकतच असतात आणि शिवाय त्यांना इंग्रजी सक्तींच करायचं म्हणजे त्यांच वय बघता त्यांच्या वर येवढा ताण देणे योग्य नाही. या प्रसंगी मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ.धों. टिल्लू यांनी श्री. सुधीर भाऊ जोशींबद्दल असलेल्या ऋण निर्देश केला. सुधीर भाऊंचे संस्थेवर असलेल्या ऋणांपैके त्यांनी विशेष उल्लेख केला. शैक्षणिक कार्यात संस्थेला आलेल्या अनेक अडचणी मधून, मार्गदर्शन करून व योग्य दिशा दाखवून संस्थेला त्यातून बाहेर काढल्या बद्दल व तसेच श्री. टिल्लू यांनी लेखन केलेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या इतिहासाची दुसरी आवृत्तीची प्रस्तावना लिहिल्या बद्दल ऋण निर्देश केला.



सौ. ए.के.जोशी स्कूल 'रोशनी' मासिकाचे प्रकाशन

या वेळी सौ. ए.के. जोशी शाळेच्य 'रोशनी' या मासिकाचे प्रकाशन श्री. सुधीर जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. सुधीर जोशी यांनी डॉ. बेडेकर यांना त्यांच्या वाढदिवसा निमित शुभेच्छा देऊन त्यांच्या बद्दल गौरवोद्‌गार काढले. डॉ. बेडेकरांनी या शुभेच्छांना उत्तर देताना सांगितले की मोठ्या भावाचे आर्शिवाद आणि प्रेम जसं असतं तसं श्री. सुधीर भाऊंचे आर्शिवाद व प्रेम या संस्थेवर आहे. ते सतत वृद्धिंगत होवो.

सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी सर्वांचे आभार मानले.

### सौ. ए.के.जोशी स्कूल

भारत -गाइडच्या ठाणे संस्थेने यंदा २० फेब्रुवारी-२००० ला लॉर्ड बेडेन पॉवेल यांच्या वाढदिवसानिमित्त 'चिंतन दिन' आयोजित केला होता. शाळेच्या २० स्काऊट व ९ गाईडनी यात भाग घेतला होता.

तेथे आयोजिलेल्या विविध स्पर्धांमध्ये शाळेने पवघवीत यश संपादन केले.

१) मुलांनी मार्च पास्ट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. २) सांस्कृतिक कार्यक्रमात तृतिय क्रमांक तर ३) तंबू सजावटीत द्वितीय क्रमांक मिळवला. ४) १०० मीटर धावणे स्पर्धेत कु. अनघा फळ प्रथम क्रमांक ५) निबंक स्पर्धेत कु. अल्पना गुप्ते चौथी तर ६) वकृत्व स्पर्धेत कु. अजिंक्य काळे याने प्रथम क्रमांक पटकावला.

शाळेतील चेन्नई येथे झालेल्या जांबोरीत सहभागी झालेल्या १० विद्यार्थींनी व २ गाईड कॅप्टन यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. डोंबिवली उपस्थित ६०० विद्यार्थ्यांमध्ये एकूण सहा बक्षिसे पटकावून सौ. ए.के.जोशी शाळा जास्तीत जास्त बक्षिसे मिळविणारी शाळा ठरली. शाळेला सर्व गाईड कॅप्टन, स्काऊट मास्टर यांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे कष्ट व मुख्याध्यापिका सौ.कोल्हटकर यांचे प्रोत्साहन यामुळेच मिळू शकले.

स्तुती आणि निंदा एकाच पारड्यात बसू शकत नाही.

**सौ. ए.के.जोशी स्कूल, ठाणे**

**Sports Day**

शाळेतील क्रीडा मोहत्सव ६ डिसेंबर ते १३ डिसेंबर १९९९ मध्ये आयोजित केला गेला. या मोहत्सवात ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक तसेच सांघिक खेळ आयोजित केले गेले. कबड्डी, डॉज बॉल, लंगडी, रोड रेस रिले या खेळांबरोबरच शू रेस, बुक बॅलेन्स, अडथळा शर्यत, थ्रो बॉल, तीन पायांची शर्यत, गोळा फेक या सारख्या वैयक्तिक मैदानी स्पर्धा घेतल्या तर इनडोअर स्पर्धेत कॅरम, बुद्धीबळ, टेबल टेनीस यांच्याही वैयक्तिक व जोडीने स्पर्धा आयोजिलेल्या. स्पर्धांमधील विजेत्या खेळांडून प्रशस्तीपत्रक देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांमधून Champion Boy व Champion Girl काढण्यात आले.

Champion Boy - गौरवजीत खंडागळे

Champion Girl - प्रियांका शिरसाट हे विद्यार्थी मानकरी ठरले.

**सौ. ए.के.जोशी स्कूल इं. मि. - पूर्व प्राथमिक विभाग**

**सौ. प्रियंका भांगले यांजकडून**



सौ. ए.के.जोशी इं.मि. स्कूल -पूर्व प्राथमिक विभाग डॉ. वा. ना. बेडेकर आपले विचार व्यक्त करताना



सौ. ए.के.जोशी इं.मि. स्कूल -पूर्व प्राथमिक विभाग सिनियर के.जी -मल्याळम डान्स

दिनांक २३ फेब्रुवारी रोजी विद्यालंकार हॉल मधे पूर्व-प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन पार पडले. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर, कार्याध्यक्ष श्री. अ.धो. टिल्लू, कॉर्डीनेटर सौ. कुलकर्णी यांच्या हस्ते वर्षभरात विविध स्पर्धांमधे पारितोषिके मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. आपले विचार व्यक्त करताना, मुलांच्या कला-गुणांचे कौतुक डॉ. बेडेकर यांची केलेच परंतु त्यांना मार्गदर्शन करून त्यांना आकार देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या पूर्व-प्राथमिक विभागाच्या शिक्षिकांचा विशेष गौरव केला. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी शाळेत होणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन अहवाल सादर केला.

**सौ. ए.के.जोशी इं.मि. स्कूल निरोप समारंभ- प्रमुख पाहुणे प्राचार्य स.वा. गोखले विद्यार्थ्यांशी हितगुज करताना.**

त्या नंतर करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमांतून विशेष उत्कृष्ट कार्यक्रमासाठी असलेल्या बाह्य पुरस्कृत बक्षीसांसाठी परीक्षण करण्या करता श्री. संजय बोरकर व श्री. रजन ताम्हणे हे उपस्थित होते. सर्वच कार्यक्रम उत्कृष्ट होते. 'दिशा' तर्फे सर्वच शिक्षिकांचे हार्दिक अभिनंदन!

---

मधुर मधातच भयंकर विष दडलेले असते.

परीक्षकांनी दिलेल्या निकाला नुसार ज्युनियर के.जी.च्या 'अल्फाबेट फॅन्सी ड्रेस पार्टी' व सिनियर के.जीचा मल्याणम डान्स हे कार्यक्रम उत्कृष्ट ठरले.

कार्यक्रमाचे सुरेख सूत्र-संचालन करून सुस्मिता प्रधान व राहुल अय्यर यांनी सर्वांचेच वाहवा मिळवली.

**सौ. ए.के.जोशी स्कूल इं. मि. - माध्यमिक विभाग इयत्ता १०वी निरोप समारंभ**

सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल चा इ. १०वी चा निरोप समारंभ दि. ३१/१/२००० रोजी पार पडला. सौ. वीणा जोशी यांनी विद्यार्थ्यांकडून तयार करवून घेतलेल्या सुरेल प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरवात झाली.



**सौ. ए.के.जोशी इं.मि. स्कूल निरोप समारंभ-प्रमुख पाहुणे प्राचार्य स.वा. गोखले विद्यार्थ्यांशी हितगुज करताना.**

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी प्रमुख पाहुणे प्राचार्य स.वा. गोखले (ठाणे महाविद्यालयाच्या कला व वाणिज्य शाखेचे प्राचार्य) यांची ओळख करून दिली व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री. गोखले यांनी आपल्या भाषणात प्रथम ९वीच्या विद्यार्थ्यांतर्फे हा कार्यक्रम केला जात असल्याची कल्पना आवडल्याचे सांगितले. ते म्हणाले, इच्छाशक्ती, मेहनत व आत्मविश्वास असेल तर यश हे मिळतेच. हव्या त्या क्षेत्रात कुवत व आवड लक्षात घेऊन डोळे उघडे ठेवून प्रवेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

शाळेच्या कोऑर्डिनेटर सौ. सुमेधा कुलकर्णी यांनी आपल्या संस्कृत भाषणातून मुलांना २१व्या शतकाकडे जाण्यासाठी तंत्रज्ञान विज्ञान व संगणकाची कास धरण्यास सांगितले.

शार्दुल म्हात्रे, समिधा भसे, मधुरा ओक, हिमांशु देशपांडे इ. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी,इंग्रजी अशा विविध भाषांतून आपली मनोगते व्यक्त केली. शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. तेजस्विनी तेलंग यांनी अभ्यासावर एकाग्रचित्त करून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सौ. ऋता पाटील यांनी गणित आणि सायन्स बरोबरच भाषेची ही अभ्यासातील महत्त्व दर्शवून दिले. अध्यक्ष डॉ.वा.ना. बेडेकर यांनी मेहनत व प्रामाणिक पणा या गुणांवर यश मिळवण्यास सांगितले व गुणवत्ता यादीत येण्यासाठी मुलांना शुभेच्छा दिल्या.

इ.९वी चे विद्यार्थी उदय कुलकर्णी व शीतल हळदवणेकर यांनी सूत्रसंचलन केले तर वरुण जोशी याने आभार मानले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर - प्राथमिक विभाग**

प्राथमिक विभागातील इयत्ता १ली ते इयत्ता ४थी च्या इयत्तेनुसार वेगवेगळ्या ठिकाणी शैक्षणिक सहली फेब्रुवारी महिन्यात नेण्यात आल्या. इयत्ता २री व इयत्ता ४थी च्या विद्यार्थ्यांची सहल गोरेगाव येथील मॉडर्न बेकरी व आरे दुग्ध वसाहत येथे नेण्यात आली. मॉडर्न बेकरी येथे

सहलीस आलेले सर्व विद्यार्थ्यांना स्वखुशीने भेट म्हणून पेन्सिल, पट्टी व रबर देण्यात आले. इयत्ता १ली व इयत्ता ३री ची सहल अनुक्रमे 'जिजामाता उद्यान' भायखळा व 'संजय गांधी उद्यान' बोरीवली येथे नेण्यात आली.

प्राथमिक विभागात विद्यार्थ्यांचा 'हळदी कुंकू' समारंभ ही मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा केला.

कॅमलिन या कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या 'ऑल इंडिया कॅमल कलर कॉन्टेस्ट ९९' या स्पर्धेत इयत्ता १ली व इयत्ता २री तील अनुजा यशवंत जोशी, प्रणव प्रभाकर फिरके, श्रेयश श्रीधर केळकर, तन्मय विद्याधर भोळे हे विद्यार्थी विजयी झाले तर इयत्ता ३री व इयत्ता ४थी तील सात्विक प्रमोद पेणकर, गार्गी सतिश मुणगेकर, अनुश्री प्र. गोडबोले, अनुराधा गिरीश ओगले हे विद्यार्थी विजयी झाले. विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र कॅमल कंपनी तर्फे देण्यात आली.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर - माध्यमिक विभाग**

☆ नॅशनल सेंटर फॉर आर्ट, कल्चर अँड हेरिटेज, परभणी आयोजित राष्ट्रीय पातळीवरील चित्रकला स्पर्धेत इ. ५वी, इ. ९वी चे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

☆ रोटरी क्लब ऑफ नॉर्थ आयोजित Wall Painting स्पर्धेतही ९वी च्या विद्यार्थ्यांचा आणि कलाशिक्षक श्री. कोळी व सौ. दांडेकर यांचा प्रदर्शनात सहभाग.

☆ डोंबिवली जिमखाना आयोजित खुल्या जलतरण स्पर्धेत कु. शशांक केतकर (९ब) यास १०० मी. बॅकस्ट्रोक स्पर्धेत रौप्य पदक व २०० मी. वैयक्तिक मिडले स्पर्धेत कास्य पदक प्राप्त झाले.



**डॉ. बेडेकर विद्या मंदिर 'पारिजातक' प्रकाशन सोहळा प्रमुख पाहुणे डॉ. अंबीकर आपले विचार मांडताना.**

☆ दि. ५ फेब्रुवारी २००० रोजी शाळेचा पारिजातक अंक प्रकाशन व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ पार पडला.

शुभेच्छा समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल अंबीकर हे उपस्थित होते. मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ ठराविक वाटेने म्हणजे डॉक्टर किंवा इंजिनिअर न होता संशोधक व्हा असा सल्ला दिला. हे संशोधन असे विज्ञानात करता येते तसेच भाषाविषयातही करता येते तेव्हा त्या दृष्टीने पुढे जा. असेही ते म्हणाले.

डॉ. अंबीकर हे बी.एस्‌.सी.बी.एड्‌. असूनही त्यांनी रशियन भाषेचा अभ्यास करून एम.ए..ची पदवी प्राप्त केली. दिल्ली व मॉस्को विद्यापीठाचा रशियन भाषेचा डिप्लोमा यशस्वीरीत्या पूर्ण केला व 'मराठी व रशियन व्याकरणातील नाम व क्रियापदांचा तौलनिक अभ्यास' या विषयावर प्रबंध सादर करून डॉक्टरेटही प्राप्त केली. नुसतीच त्यांनी यु.सी.जी. ची शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे त्यासाठी ते मार्च मध्ये रशियाला जाणार आहेत.



डॉ. बेडेकर विद्या मंदिर -शाळेचा माजी विद्यार्थी व सुप्रसिद्ध गझल गायक श्री. अनिरुद्ध जोशी पारिजातकचे प्रकाशन करताना.

'पारिजातक अंकाचे प्रकाशन आपल्या शाळेचा माजी विद्यार्थी व सुप्रसिद्ध गझल गायक श्री. अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते झाले. त्यांनी शुभेच्छा देताना विद्यार्थ्यांना सांगितले की कुठलेही क्षेत्र निवडा . त्यासाठी लागणारी जिद्द, चिकाटी, मेहनत अंगी बाणवा मग यश तुमचेच आहे. यानंतर त्यांनी आपल्या सुमधुर आवाजात गझल सादर केली व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. श्री. अनिरुद्ध जोशी यांना नुकताच 'अचिव्हर ऑफ मिलेनियम' हा पुरस्कार दिल्ली येथील समारंभात प्रदान करण्यात आला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाल्या,

'Life if an ever Howing stream
Don't let it go out of the dream
You must put in your best
To stand out among the rest
To go away really so far
You have to shine like a star'

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापिका सौ. ज्योत्सा चौवळ यांनी केले. सूत्र संचलन सौ. ज्योति सोमण व आभार प्रर्दशन पर्यवेक्षक श्री. कुलकर्णी यांनी केले. डॉ. अनिल अंबीकर यांची ओळख सौ. मंजिरी दांडेकर यांनी करून दिली तर श्री. अनिरुद्ध जोशी यांची ओळख सौ. अंजली पंडीत यांनी करून दिली. 'पारिजातक'च्या संपादिका सौ. उषा कळमकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सौ. मीना गाडगीळ, सौ. मंजिरी दांडेकर यांनी इ.१०वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षकांतर्फे शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचीही कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे झाली.

☆ काही निवडक विद्यार्थिनींसह सौ. मंजिरी दांडेकर यांनी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टला भेट दिली. तेथील उपयोजित कला विभागाचे प्रदर्शन पाहून स्कूल ऑफ आर्टमधील इतर विभागांची माहिती करून घेतली.

☆ दि. १२ व १३ फेब्रुवारी २००० रोजी सहयोग मंदिर येथे 'होप' संस्थेतर्फे निसर्गजत्रा २०० हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यात वृक्षदिंडीच्या कार्यक्रमात उपमुख्याध्यापिका सौ.ज्योत्स्ना चौवळ, सौ. नेत्रा सोनवणे, सौ. वंदना अडसुळे व इ.६वी व ७ वीचे विद्यार्थी सहभागी होते.

याच कार्यक्रमात आपल्या शाळेने 'आणि माळ हिरवा झाला' हे सौ. मंजिरी दांडेकर लिखित व दिग्दर्शित पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यास अनामिक व्यक्तीतर्फे रु. १०० रोख पारितोषिक प्राप्त झाले.

दि. १८ फेब्रु.२००० रोजी विद्याविहार येथील के.जे. सोमैय्या कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आयोजित रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी कला शिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर या उपस्थित होत्या.

☆ आपल्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर या दि. १८ फेब्रुवारी २००० रोजी स्वा. सावरकर नगर येथील 'विद्यामंदिर' मौजे कुंभार खाणी नु ॥ या

शाळेतील पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

☆ नवजीवन हायस्कूल भांडुप येथील इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना समाजशास्त्र विषयाच्या मार्गदर्शनासाठी पर्यवेक्षक श्री. प्र.वा. कुलकर्णी हे उपस्थित होते व संस्कृत विषयाच्या मार्गदर्शनासाठी सौ. मीरा लिमये या उपस्थित होत्या.

☆ विद्यार्थ्यांच्या वार्षिक चित्रकलेच्या कामाचे प्रदर्शन शाळेच्या कलादालनात आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून रहेजा स्कूल ऑफ आर्ट, वरळी चे प्रिन्सिपॉल व ठाण्यातील सुप्रसिद्ध कलाकार श्री. डी.जी. पुजारी हे उपस्थित होते. तसेच शाळच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, मंडळाचे पदाधिकारी श्री. अ.धो.टिल्लू, श्री. ल.ग. देव, श्री. दिलीप जोशी व ठाण्यातील सुप्रसिद्ध बोधचिन्हकार श्री. शांताराम राऊत हे उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री. पुजारे म्हणाले, 'या शाळेत हा विषय इतक्या आस्थेने शिकविला जात आहे व योग्य वयात मुलांवर संस्कार होत आहेत हे पाहून आनंद झाला. चित्रांमधे रंग आणि रचना यांचा उत्तम संगम जाणवतो. विद्यार्थ्यांचे रंगज्ञान व रेषेचा जोरकसपणा उच्च दर्जाचा आहे.'

श्री. शांताराम राऊत म्हणाले, ' इ.९वी व १०वी ची चित्रे फाउंडेशनच्या दर्जाची वाटतता इतकी छान आहेत.'

डॉ. बेडेकर व उपस्थितांनी बालकलाकारांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

**V.P.M. Institute of Management Studies**
**वि.प्र.मं. ची व्यवस्थापन अभ्यास संस्था**

या वर्षीचा २६ जानेवारी या कार्यक्रम जरा वेगळ्या प्रकारे साजरा करायचा असे वि.प्र.म.च्या व्यवस्थापद अभ्यास संस्थेने ठरवीले म्हणूनच कर्जत येथिल धामणी परिसरात आदिवासी मुले, तरुणवर्ग व स्त्रीयांसाठी पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आखला गेला.



**V.P.M. Institute of Management Studies, Thane**
**२६ जानेवारी २००० चा कार्यक्रम**

कार्यक्रमाची सुरुवात त्या विभागाचे उपसरपंच श्री. चौधरी यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाली. यानंतर तेथिल प्राथमिक शाळेतील मुलांनी मनोरंजानाचे विविध कार्यक्रम सादर केले.

यानंतर सुशिक्षित बेरोजगार तरूणांसाठी स्वयंरोजगार शिवीर आयोजित केले गेले. या शिवराचे उद्घाटन मोग्रस ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. अगविले यांनी केले. याच गावातील महाविद्यालयातील B.Sc. चा विद्यार्थी प्रदिप भोईर याने प्रा. लाड यांच्या मार्गदर्शनाखाली जॉर्ज कार्वर या कृषीशास्त्रज्ञाने केलेल्या भरीव कामगीरी बद्दल माहिती सांगून इतर उपस्थित विद्यार्थ्यांचे मनोबल वाढीवीले. श्री. मनुभाई रावळ (कृषीशास्त्र तज्ञ) यांनी शेती व्यवसायातून श्रीमंत कसे होता येईल या विषयी मार्गदर्शन

केले तर प्रा. लाड यांनी कुकुटपालन, दुग्धव्यवसाय, औषधी वनस्पती, फलप्रक्रिया या प्रकारचे बरेच व्यवसाय स्थानिक उद्योजक उभारू शकतात असे निदर्शनास आणून दिली व यासाठी लागणारी बाजारपेठ मिळवून देण्यास आमच्या संस्थेचे विद्यार्थी मदत करतील असे आश्वासनही दिले.

दुपारच्या वेळेत स्थानिक महिला मंडळाला प्रा. लाड आणि आमच्या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले व महिलांनी बनवीलेल्या पापड, लोणचे , सांडगे इ. च्या विक्री व्यवस्थापनाचे आश्वासनही दिले.

**२७ जानेवारी २०००**

वि.प्र.मच्या व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे दि. २७ जानेवारी २००० रोजी 'मनुष्यबळ विकास व्यवस्थापकांची (H.R.D. Managers) एक सभा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी ठाण्यातील विविध मान्यवर उद्योग संस्थेचे सुमारे ३५ मनुष्यबळ विकास व्यवस्थापक उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला डॉ. वा.ना. बेडेकर यांची चहापानस उपस्थित राहून उपस्थितांचे स्वागत केले.

National Institute of Personnel Managers चे ठाणे विभागाचे अध्यक्ष श्री. बानोडकर यांनी I.M.S. विद्यार्थ्यांना मॅनेजर्सनी मदत करावी असे आवाहन या प्रसंगी केले.



V.P.M. Institute of Management Studies, Thane



ठाणे विधी महाविद्यालयात 'मिलेनीयम म्युझीक नाईट-२०००'

छायाचित्रात -ठाण्याचे पोलीस आयुक्त भुजंगराव मोहिते, विद्याप्रसारक मंडळाचे संस्थापक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर, कॉलेजच्या सेक्रेटरी जया यादव

**H.R.D. Managers Meeting**

प्रा. लाड यांनी बदलत्या काळात Multy Skilling & Multy Capability याची गरज असल्याचे सांगितले. तसेच H.R.D. Managers नी सतत शिकत राहिले पाहिजे. प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी H.R.D. Managers ची सभा घेण्यात येईल असा निर्णय यावेळी घेण्यात आला. डॉ. जोशी यांच्या आभार प्रदर्शनाने सभेची सांगता झाली.

**१९ डिसेंबर १९९९**

१९ डिसेंबर १९९९ रोजी वि.प्र.मच्या व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे NIPM (Natioanl Institute of Personnel Managers) च्या मदतीने मनुष्यबळ विकास व्यवस्थापकांचे (H.R.D. Managers) चर्चासत्र चौधरी वाडी, धामणी, कर्जत येथे आयोजित केले गेले. यासाठी आमच्या विद्यार्थ्यांनी सुमारे १५० उद्योग संस्थांना भेट देऊन त्यांच्या H.R.D. Managers ना निमंत्रित केले

होते.सकाळी १०.०० वाजता उपहारानंतर चर्चासत्राला सुरूवात झाली. ठाणे - बेलापूर औद्योगिक परिसरातील विविध मान्यवर उद्योग संस्थांतील सुमारे १६ मनुष्यबळ विकास व्यवस्थापक चर्चासत्राला उपस्थित होते.

प्रा. लाड यांनी स्वागतपर भाषणात पुणे विद्यापीठाच्या मानव वंश शास्त्र विभागाच्या प्राध्यापकांनी कर्जत परिसरात १५ दिवस केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांना धन्यवाद दिले व आभार मानले. बदलत्या जगामधे भारताचे आर्थिक बळ वाढविण्यासाठी आपल्याला शेती व्यवसायामध्ये व्यवस्थापन आणून शेतीव्यवसाय वाढवीणे व H.R.D. Managers नी व इतर मॅनेजर्सनी आपला या बद्दल विचार करणे याची अत्यंत गरज आहे व त्यासीठीच हे चर्चासत्र निसर्गाच्या सान्निध्यात व शेती परिसरात आयोजित केल्याचे सांगितले.

चर्चा सत्राच्या पहिल्या भागात पुणे विद्यापीठाच्या मानव वंश शास्त्र विभागाच्या प्राध्यापकांनी चौधरी वाडी व मोग्रस या भागात केलेल्या संशोधना विषयी सर्व उपस्थितांना माहिती देऊन आदीवासी लोकांकडेही बरेच काही शिकण्यासारखे आहे, असे सांगितले. तद्नंतर श्री. बनोडकर (संचालक टोयो इंजिनिअरींग) यांनी I.M.S.च्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कौतुक केले. व H.R.D. Managers नी आपले अनुभव सांगावे अशी विनंती केली. या नंतर (H.R.D. Managment) नी मनुष्यबळ विकास व्यवस्थापन क्षेत्रातील अडचणी व या क्षेत्रातील अस्थिरता या विषयी चर्चा झाली. भोजना नंतर दुसऱ्या भागात प्रा. लाड यांनी सांगितले की अस्थिरतेला लढा देऊनच स्थिरता येई शकते व त्या साठी प्रत्येकाने आपली क्षमता वाढवणे आवश्यक आहे. या नंतर H.R.D. क्षेत्रातील नवीन आव्हाने व या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी H.R.D. मॅनेजर्सनी आपली क्षमता कशी वाढवावी या विषयावर चर्चा झाली.

विद्यार्थ्यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने चचासत्राची सांगता झाली.

### ठाणे विधी महाविद्यालयात 'मिलेनीयम म्युझिक नाईट-२०००'

भविष्यात न्यायदानाच्या पवित्र क्षेत्रात कार्य करणाऱ्या ठाणे विधी महाविद्यालय, ठाणेच्या विद्यार्थ्यांनी आज महाविद्यालयाच्या वार्षिक कार्यक्रमात आपले अंगभुत कलागुण दाखवुन बहार आणली. 'मिलेनियम म्युझीट नाईट-२०००' या नेत्रदिपक सोहळयास विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ठाण्याचे पोलीस आयुक्त भुजंगराव मोहिते यांच्या हस्ते दीपप्रज्वल करण्यात आले. श्रीमती मोहिते, पोलीस उपायुक्त अशोक धिवरे, विद्या प्रसारक मंडळाचे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर, कॉलेजचे प्राचार्य एस.एम.इंजीनीयर, प्रा. डॉ.डॅनीयल यांचे स्वागत अनुक्रमे कॉलेजच्या जनरल सेक्रेटरी जया यादव, विल्सन वर्गीस, नायर यांनी केले. गायत्री मंत्राच्या गायनाने सोहळ्यास सुरूवात झाली. जी.एस. जया यादव यांनी सर्वांचे स्वागत केले. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. मोहिते आणि अध्यक्ष डॉ. वा.ना. वेडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य इंजीनीयर, डॉ. डॅनीयल यांनी देखील आपले विचार मांडले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते याप्रसंगी बक्षिस वितरण करण्यात आले. हेमंत ससाणे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर, कार्याध्यक्ष श्री. अ.धों. टिल्लू, कोषाध्यक्ष श्री. मा.य. गोखले व सभासद श्री. ल.ग. देव उपस्थित होते.

**बांदोडकर महाविद्यालय**
**यशवंतराव चव्हाण विद्यापीठाच्या समितीची भेट**

बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विद्याप्रसारक मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या वर्गास विद्यापीठाच्या पहाणी समितीने अलिकडेच भेट दिली. या केंद्राचे प्रमुख प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाची तयारी केली.

पहाणी समितीत विद्यापीठाच्या मानव्य शाखेचे संचालक डॉ. रमेश वरखेडे, प्रा. ए. बी. देशपांडे, विद्यापीठाचे विभागीय संचालक चंद्रकांत ओंजाळ व मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल व यशवंतराव चव्हाण विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रमाचे मानद संयोजक डॉ. शरद गणपुले यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सहकारी शरद लळित, पी.एन.आरेकर, मोरेश्वर गोडबोले, पी.आर.खापरे, आर.एस. राऊत, भरत लहानगे यांनी तर विद्यार्थी प्रतिनिधी सौ.छाया मोहिते, संजय रुळे, पल्लवी तडस आदींनी विशेष कष्ट घेतले. या भेटीच्या वेळी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष अ.धो.टिल्लू, प्राचार्य सी.जी. पाटील, प्रा. प्रदीप कर्णिक, प्रा. अशोक सरदेसाई, डॉ. प्रकाश करमरकर, प्रा. नारायण बारसे, प्रा. विजय नाईकवाडी आदी मान्यवर तसेच उपप्राचार्य म.ह. दिक्षित, डॉ. सौ. माधुरी पेजावर, तंत्रनिकेतनचे उपप्राचार्य डी.के. नायक व प्रा. कु. धर्माधिकारी उपस्थित होते.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर तर प्रमुख अतिथी पोलीस आयुक्त भुजंगराव मोहिते उपस्थित होते.

समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलन व ईशस्तवनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत करून ९९-२००० या शैक्षणिक वर्षातील घडामोडींचा अहवाल सादर केला. प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना श्री. मोहिते यांनी प्राध्यापक होण्याचे आपले स्वप्न होते असे सांगून स्वतःच्या विद्यार्थी जीवनातील आठवणी सांगितल्या. शिक्षक विद्यार्थी हे नाते अनौपचारिक असेल तर विद्यार्थी घडू शकतो. शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या पहिल्या नांवाने संबोधता आले पाहिजे असेही ते म्हणाले.

यानंतर प्रमख पाहुणे, अध्यक्ष यांच्या हस्ते वर्षभरातील महत्त्वाच्या पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कला मंडळ व अभ्यासविषयक उपक्रमांच्या पारितोषिकांचे वाचन प्रा. सौ. सुधा फाटक यांनी तर क्रीडाविषयक उपक्रमांच्या पारितोषिकांचे वाचन प्रा. व्ही.एम. फेगडे यांनी केले. पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी आभारप्रदर्शन केले. प्रा. डॉ. वृंदा मांजरमरकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

या प्रसंगी विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री.वि. करंदीकर, कार्याध्यक्ष अ.धो. टिल्लू, कार्यवाह उत्तम जोशी, मा.य. गोखले, ल.ग. देव आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संयुजा प्रकाशित**

विज्ञान महाविद्यालयाच्या १९९९-२००० या वर्षाच्या वार्षिक संयुजाचे प्रकाशन अलिकडेच संपन्न झाले.

या प्रकाशन समारंभाचे आयोजन 'संयुजा' समितीचे

विद्यार्थी प्रतिनिधी व प्राध्यापक सदस्य यांनी केले होते. प्रकाशन समारंभास उपस्थित असणारे ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य जी.बी. विशे यावेळी बोलताना म्हणाले, 'आजच्या विशेषीकरणाच्या जगात तुमच्या विषयाबरोबरच जगातील घडामोडींचे व इतर विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तुम्हाला आवडो न आवडो, जगाच्या बरोबर रहावयाचे असेल तर संगणकादी तंत्रे आत्मसात करायला हवीत. महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दिक्षित उपस्थित होते. वार्षिक समितीच्या प्रमुख कार्यकारी संपादिका प्रा. एस.एन. जोगळेकर, समितीतील शिक्षक सदस्य, इतर प्राध्यापक व विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य पाटील, प्रा. सौ. जोगळेकर व प्रा. कल्पना फळ यांचे मार्गदर्शन लाभले.

• • •

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**

**थोरले बाजीराव पेशवे सभागृह**

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क
कार्यवाह, विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
दूरध्वनी : ५४२ ६२७०

(पान क्रमांक २८वरून)

**महाराष्ट्राचा इतिहास**

हवामान : उन्हाळा ३९°ते२२°सें.,
हिवाळा ३४° ते १२° सें.
पावसाळा : जून ते सप्टेंबर

## विद्यापीठ

| | |
|---|---|
| मुंबई | : मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. भारतीय विद्यापीठ |
| जळगांव | : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| पुणे | : पुणे विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ |
| कोल्हापूर | : शिवाजी विद्यापीठ |
| औरंगाबाद | : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ |
| नांदेड | : स्वामी विवेकानंद तीर्थ विद्यापीठ |
| अमरावती | : नागपूर विद्यापीठ |
| लोणेरे | : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ |
| नाशिक | : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ |
| वर्धा | : हिंदी विश्वविद्यालय |
| रामटेक | : कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ |

## कृषी विद्यापीठे

| | |
|---|---|
| दापोली | : कोकण कृषी विद्यापीठ |
| राहुरी | : म. फुले कृषी विद्यापीठ |
| परभणी | : मराठवाडा कृषी विद्यापीठ |
| अकोला | : पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ |

• • •

आशिर्वाद हे सत्कृत्याबरोबर येतातच.